


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २७१ ■ शुक्रवार, दि. १० एप्रिल २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांचा राजीनामा
## घरात आढळल्या होत्या 500च्या जळालेल्या नोटा





वृत्तसंस्था १० एप्रिल

**प्रयागराज:** अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती यशवंत वर्मा (५७) यांनी राष्ट्रपतींकडे आपला राजीनामा सादर केला आहे. १४ मार्च २०२५ रोजी त्यांच्या दिल्लीतील घरात लागलेल्या आगीत ५००-५०० रुपयांच्या नोटांचे बंडल जळालेल्या अवस्थेत सापडले होते. या वादामुळे त्यांची दिल्ली उच्च न्यायालयातून अलाहाबाद उच्च न्यायालयात बदली करण्यात आली होती.त्यांनी ५ एप्रिल २०२५ रोजी अलाहाबाद उच्च न्यायालयात शपथ घेतली होती. मात्र, त्यांना कोणतीही जबाबदारी देण्यात आली नव्हती. त्यांच्याविरुद्ध सुरू असलेली चौकशी पूर्ण होईपर्यंत त्यांना न्यायिक कामांपासून दूर ठेवण्यात आले होते.रोख रकमेच्या प्रकरणात नाव आल्यानंतर त्यांच्याविरुद्ध लोकसभेत महाभियोग प्रस्ताव आणण्यात आला होता. न्यायमूर्ती वर्मा यांनी त्यांच्याविरुद्ध आणलेल्या महाभियोग प्रस्तावाला आव्हान दिले होते. याचिकेत म्हटले होते की, दोन्ही सभागृहात महाभियोग प्रस्ताव आणला गेला होता.

### संसदीय चौकशी पॅनेलमध्ये त्रुटी सांगितली

७ जानेवारी रोजी न्यायालयाने म्हटले होते की लोकसभा अध्यक्षांनी स्थापन केलेल्या संसदीय चौकशी पॅनेलमध्ये काही त्रुटी दिसून येतात. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते की न्यायाधीश चौकशी कायद्यांतर्गत लोकसभा अध्यक्षांना हा अधिकार आहे की ते न्यायमूर्ती वर्मा यांच्यावरील भ्रष्टाचाराच्या आरोपांची चौकशी करण्यासाठी समिती स्थापन करू शकतात, राज्यसभेत असाच प्रस्ताव फेटाळला गेला असला तरीही.सर्वोच्च न्यायालयाने १६ डिसेंबर २०२५ रोजी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना नोटीस बजावली होती. न्यायमूर्ती दीपांकर दत्ता आणि ए.जे. मसीह यांच्या खंडपीठाने लोकसभा अध्यक्ष कार्यालय आणि दोन्ही सभागृहांच्या महासचिवांकडून उत्तर मागवले होते.

## मुंबई शेअर बाजार उघडताच ४ लाख कोटींची कमाई

प्रतिनिधी १० एप्रिल

**मुंबई :** भारतीय शेअर बाजारांची सुरुवात आज (शुक्रवारी) तेजीने झाली आहे. इराण आणि अमेरिका यांच्यात युद्धविराम होण्याची आशा आणि इतर सकारात्मक संकेतांमुळे सुधारलेल्या बाजार-भावनेचा आधार मिळाल्याने, सेन्सेक्स आणि निफ्टी या प्रमुख निर्देशांकांमध्ये सुमारे ०.७ टक्क्यांची वाढ नोंदवली गेली.

शुक्रवारी सकाळी ९:१५ वाजता सेन्सेक्स ५३४ अंशांनी वधारून ७७,१६५ वर पोहोचला, तर निफ्टी ५० मध्ये १७२ हून अधिक अंशांची वाढ होऊन तो २३,९४७ च्या पातळीवर पोहोचला. या जोरदार तेजीमुळे बीएसई वर सूचीबद्ध असलेल्या सर्व कंपन्यांच्या एकूण बाजार भांडवलामध्ये ४ लाख कोटी रुपयांहून अधिकची भर पडली आणि हे एकूण भांडवल वाढून ४४९ लाख कोटी रुपयांवर पोहोचले आहे.

# पैसे नसतील तर लाडकी बहीण योजना बंद करा!
## हायकोर्टाने राज्य सरकारला फटकारले

प्रतिनिधी १० एप्रिल



**मुंबई :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमुळेच महायुतीने विधानसभा निवडणुकांमध्ये बाजी मारल्याचे अनेक नेत्यांनी उघडपणे बोलूनही दाखवले आहे. मात्र या योजनेचा परिणाम आता इतर मूलभूत योजनांच्या निधी वाटपावर होत असल्याचे चित्र आहे. याच मुद्द्यावर बोट ठेवत आता लाडकी बहीण योजनेवरून मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारला तीव्र शब्दात फटकारले आहे.

सातव्या वेतन आयोगानुसार शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन तसेच अन्य लाभ देण्यास राज्य सरकारकडे पैसे नसतील, तर लाडकी बहीण योजना बंद करावी, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण मुंबई उच्च न्यायालयने नोंदवले आहे.

दरम्यान, मुंबई महापालिकेच्या शिक्षण विभागातून निवृत्त झालेल्या महिलेने तिला सातव्या वेतन आयोगानुसार निवृत्तीवेतनासह अन्य लाभ न दिल्याने या महिलेने मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली होती. या याचिकेवर पालिकेच्या वकिलांची कोर्टात आपली भूमिका मांडताना सांगितलं कि, सातव्या वेतन आयोगानुसार निवृत्तीवेतन तसेच अन्य लाभ देण्यासाठी पालिकेकडे पैसे नाहीत, कारण राज्य सरकार पैसे देत नसल्याची भूमिका मांडली.

### इतर अनेक योजनांना बसतोय फटका!

या लाडकी बहीण योजनेचा फटका काही प्रमाणात इतर योजनांना देखील बसला होता, राज्याची आर्थिक घडी या योजनेमुळे काहीशी विस्कटल्याने अपात्र महिला शोधण्याची मोहीम महिला व बालकल्याण विभागाने राबवली होती. अनेक शासकीय कर्मचारी, महिलांच्या नावे काही पुरूष देखील या योजनेचा लाभ घेत असल्याचे समोर आले होते. योजनेच्या अटी पूर्ण न करणाऱ्या किंवा श्रीमंत घरातील महिलाही या योजनेचा लाभ घेत असल्याने सरकारने लाभार्थी खातेदारांचे केवायसी करण्याचा निर्णय घेतला होता. यामुळे आता ७१ लाख लाडक्या बहिणी अपात्र ठरल्या आहेत.

# भारतीयांना इराण सोडण्याच्या सूचना

वृत्तसंस्था १० एप्रिल

**नवी दिल्ली :** इराणमधील भारतीयांनी शक्य तितक्या लवकर आपल्या मायदेशी परतावे, असे आवाहन भारतीय दूतावासाने बुधवारी (९ एप्रिल) केले आहे. भारताच्या या भूमिकेनंतर पश्चिम आशियात पुन्हा संघर्षाचा वणवा पेटणार असल्याची आवई समाजमाध्यमांवर उठली आहे.

सहा आठवड्यांच्या रक्तरंजित संघर्षानंतर अमेरिका आणि इराण यांच्यात अखेर दोन आठवड्यांचा तात्पुरता युद्धविराम झाला. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मंगळवारी समाजमाध्यमांवर पोस्ट शेअर करीत त्याबाबतची माहिती दिली. या घडामोडीनंतर जगभरातील अनेक देशांनी सुटकेचा श्वास सोडला. यादरम्यान युद्धविरामाच्या घोषणेनंतरही भारत सरकारने इराणमधील आपल्या नागरिकांना देश सोडण्याचे आवाहन केले आहे.दरम्यान इराणने हॉर्मुझची सामुद्रधुनी तातडीने खुली न केल्यास त्यांच्या पायाभूत सुविधांवर मोठे हल्ले केले जातील.

# विधानसभा निवडणुकीपूर्वी कोलकात्यात ईडीची मोठी कारवाई!

प्रतिनिधी १० एप्रिल

**कोलाकाता :** पश्चिम बंगालमध्ये २३ एप्रिल रोजी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यापूर्वी ईडीने मोठी कारवाई केली आहे. एजन्सीच्या कोलकाता झोनल कार्यालयाने शहरात ८ ठिकाणांवर छापे टाकले. ही कारवाई बिस्वजीत पोद्दार ऊर्फ 'सोना पप्पू', जय एस. कमदार आणि इतरांविरुद्ध सुरू असलेल्या मनी लॉंड्रिंग प्रकरणात करण्यात आली आहे.

या छापेमारी दरम्यान ईडीने तब्बल १.४७ कोटी रुपये रोख, ६७.६४ लाख रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने, अनेक महत्त्वाची कागदपत्रं आणि डिजिटल उपकरणं जप्त केली आहेत. या कारवाईत एक 'फॉर्च्युनर' कार देखील जप्त केली असून, ही कार बिस्वजीत पोद्दार ऊर्फ सोना पप्पू वापरत होता.

# 'ऑपरेशन टायगर' एकनाथ शिंदे गटाकडून सारवासारव!

प्रतिनिधी १० एप्रिल



**मुंबई :** 'ऑपरेशन टायगर'च्या वादळाने राज्याचे राजकारण पुन्हा एकदा ढवळून निघाले आहे. या वादळात कोण कुणाचं, याचा थांगपत्ता लागेनासा झाला. पण खासदार अरविंद सावंत यांनी समोर येत जळजळीत प्रतिक्रिया दिली. त्यानंतर लागलीच एकनाथ शिंदे गोटातूनही सारवासारव करण्यात आली.

राज्याच्या राजकारणात महाभूकंप येणार अशा चर्चांनी पुन्हा जोर धरला. एकनाथ शिंदे गेल्या महिन्यात दिल्लीत ठाण मांडून होते. त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. त्याचवेळी खासदारांशी चर्चा केली. या भेटीदरम्यान उद्धव सेनेचे काही खासदारांशी त्यांनी संपर्क साधल्याचा दावा करण्यात आला. ते मुंबई दाखल झाल्यावर तर उद्धव सेनेचे ८ खासदार गळाला लागल्याच्या चर्चांनी जोर धरला. पण मध्यंतरी या चर्चा थंड बस्त्यात गेल्या. तर आज एकनाथ शिंदे हे सातारा जिल्ह्यातील त्यांच्या दरे गावी गेले आणि पुन्हा उद्धव सेनेला खिंडार पडण्याच्या जोर बैठका सुरू झाल्या. आता स्वत: उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पडदा टाकला आहे. एकनाथ शिंदे हे दरे गावी असताना ते ऑपरेशन टायगर राबवणार असल्याचा दावा करण्यात येत होता. त्यात उद्धव सेनेचे ८ खासदार शिंदे गोटात येण्याचा दावा करण्यात आला होता. २४ तारखेला शिवसेना कुणाची याची अंतिम सुनावणी होणार आहे.

# काशी यात्रेतील बस अपघातात बुलढाणा, अकोला येथील दोन महिलांचा मृत्यू




प्रतिनिधी १० एप्रिल

**खामगाव :** देवदर्शनासाठी निघालेल्या महाराष्ट्रातील भाविकांच्या बसला उत्तर प्रदेशातील गाजीपूर जिल्ह्यातील नंदगंज परिसरात अपघात झाला असून, या दुर्घटनेत बुलढाणा व अकोला जिल्ह्यातील दोन महिलांचा मृत्यू झाला आहे. तर ३८ भाविक जखमी झाले असून त्यापैकी तिघांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

'जय श्रीराम टूर्स अँड ट्रॅव्हल्स'तर्फे आयोजित काशी-अयोध्या यात्रेसाठी महाराष्ट्रातून भाविक रवाना झाले होते. ९ एप्रिल रोजी सकाळी सुमारे ११.३० वाजता वाराणसी-गोरखपूर राष्ट्रीय महामार्गावर गाजीपूरजवळील नंदगंज येथे बसचा अपघात झाला. या अपघातात अकोला जिल्ह्यातील अन्नपूर्णाबाई (वय ५०) आणि बुलढाणा जिल्ह्यातील मोताळा तालुक्यातील रोहिणखेड येथील सरस्वतीबाई पाखरे यांचा घटनास्थळी मृत्यू झाला. उर्वरित जखमींना गाजीपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.अपघाताची माहिती मिळताच केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी उत्तर प्रदेशातील प्रशासनाशी तातडीने संपर्क साधला. जखमींना त्वरित आणि आवश्यक उपचार मिळावेत, यासाठी त्यांनी स्थानिक अधिकाऱ्यांना निर्देश दिले गाजीपूरचे जिल्हाधिकारी दिनेश कुमार आणि मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. सुनील पांडे यांच्याशीही दूरध्वनीवरून संपर्क साधण्यात आल्याची माहिती आहे. दरम्यान, जखमींना मदत आणि समन्वयासाठी दिल्लीहून एक पथक गाजीपुरकडे रवाना करण्यात आले.

धामणगाव बढे व रोहिणखेड परिसरातील २१ भाविक काशी विश्वनाथ व पशुपतिनाथ दर्शनासाठी दोन बसद्वारे गेले होते. ज्या बसमध्ये ४८ प्रवासी होते त्या बसला अपघात झाला. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही घटनेची दखल घेत समन्वय साधण्याच्या सूचना दिल्या आहेत.

# हरभरा खरेदी बारदाना तुटवड्याने संकटात!

प्रतिनिधी १० एप्रिल

**धाराशिव :** राज्यात हमीभावाने हरभरा खरेदीसाठी अवघे २० दिवस शिल्लक असताना बारदान्याचा तीव्र तुटवडा निर्माण झाला आहे. पणन मंत्र्यांनी बारदाना खरेदीचे अधिकार स्वतःकडे घेतल्याने ही प्रक्रिया रखडली आहे. आतापर्यंत १ लाख ३३ हजार शेतकऱ्यांकडून ७ लाख क्विंटल हरभऱ्याची खरेदी झाली असली, तरी अद्याप १ लाख ५५ हजार शेतकरी विक्रीच्या प्रतीक्षेत आहेत. अनेक हमीभाव केंद्रावरील माप बंद असल्याने शेतकऱ्यांना नाईलाजास्तव आपला माल खासगी बाजारात कमी दराने विकावा लागत आहे. यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे.पूर्वी बारदाना खरेदीचे अधिकार फेडरेशनकडे होते, यामुळे गरजेनुसार तातडीने खरेदी होत होती. मात्र, पणन मंत्र्यांनी ही प्रक्रिया केंद्रिकृत केल्यामुळे आता सर्व केंद्रांना पणन विभागाच्या बारदाना पुरवठ्यावर अवलंबून राहावे लागत आहे.

# जिल्ह्यात अद्यापही केरोसीन वितरणाचा मुहूर्त मिळेना!



प्रतिनिधी १० एप्रिल

**अकोला :** गॅस तुटवड्याला पर्याय म्हणून जिल्ह्यातील अत्योदय व प्राधान्य घटकातील रेशन धारकांसाठी केरोसीन वितरणचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार शासनाकडे जिल्ह्यातील रेशनधारकांची माहिती मागवण्यात आली. त्यानंतर जिल्ह्यासाठी ७२ हजार लीटर केरोसीन मंजूर झाले होते. ते मागणीच्या तुलनेत अत्यल्प असले तरी अद्यापही केरोसीन वाटपाचा मुहूर्त गवसत नसल्याने अनेक रेशनधारक चातकासारखी या केरोसीनची वाट पाहत आहेत.

राज्यसरकारने अंत्योदय आणि प्राधान्य घटकातील कुटूंबांना ३ लीटर केरोसिन वितरणाचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी प्रत्येक जिल्ह्यासाठी केरोसीन कोटा मंजूर करण्यात आला आहे. मात्र या केरोसीनचे वितरण कसे करायचे हा यंत्रणांसमोरील मोठा प्रश्न आहे. रास्त भाव दुकानामधील केरोसीन वितरण करणारी यंत्रणा खंडित झाली आहे. त्यामुळे दुकानदारांना तालुका पातळीवरून केरोसीन आणून ते वितरण करणे अडचणीचे ठरणार आहे. तसेच लाभार्थ्यांच्या तुलनेत कोटा कमी मंजूर झाल्याने ते कोणत्या लाभार्थीला द्यावे आणि कोणाला देऊ नये, अशी परिस्थिती निर्माण होऊन यातून वादाचे प्रसंगही उद्भवण्याची शक्यता नाकारता येत नाही.

### केरोसीन वितरणाचा गंभीर प्रश्न

केरोसीनचे वितरण कसे करावे हा यंत्रणासमोरील सर्वात मोठा प्रश्न आहे. कारण रास्त भाव दुकानदार केरोसीनचे वितरण करण्यास फारसे इच्छुक नाहीत. २०१६ पूर्वी केरोसीन वितरणासाठी व साठा करण्याची एक साखळी होती. ती आता राहिली नसल्याने आलेले रॉकेल कोठे साठवावे आणि त्याचे मोजमाप करण्यासाठी यंत्रणा पुन्हा उभारावी लागणार असल्याने ते दुकानादारांसाठी अडचणीचे ठरणार आहे.

### रास्त भाव दुकानदार उदासीन

शासनाने केरोसीन वितरणासाठी लागणारी साधन सामुग्री उपलब्ध करून देण्याचा दुकानदारांवर टाकला आहे. तालुका पातळीवरून केरोसीनची उचल करून दुकानापर्यंत नेण्याची व्यवस्थाही दुकानदारांना करण्यास सांगितली आहे. त्यामुळे रास्त भाव दुकानदार केरोसीन वितरणासाठी उदासीन दिसून येत आहेत.

### नागरिकांच्या रोषाचाही करावा लागेल सामना

जिल्ह्यात जवळपास प्राधान्य गट व अंत्योदय गटातील लाभार्थ्यांची संख्या जवळपास अडीच लाखांच्या घरात आहे. त्यासाठी ७२ हजार लीटर केरोसीनचा कोटा मंजूर झाला आहे. प्रत्येकाला ३ लीटर केरोसीन वाटप करावयाचे आहे. त्यामुळे हे केवळ २४ हजार लाभार्थींना ते वाटप होऊ शकते. त्यातही उपलब्ध झाल्यास इतर रेशनधारकांना आणि स्थलांतरितांनाही देण्याचे आदेशात नमूद आहे. जे लाभार्थी आहेत त्यांनाच ते पुरणार नसल्याने त्यांच्या रोषाचा सामना प्रथम रास्त भाव दुकानदारांनाच करावा लागणार आहे.

# पुणे जि.प.ची पहिली इंग्रजी माध्यमाची आंतरराष्ट्रीय शाळा सुरू

प्रतिनिधी १० एप्रिल

**पुणे :** पुणे जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाचा ड्रीम प्रोजेक्ट ठरलेली पुरंदर तालुक्यातील खानवडी येथील 'ज्योती सावित्री जिल्हा परिषद शाळा' अखेर प्रत्यक्षात साकारत असून, येत्या ११ एप्रिल रोजी या शाळेची पहिली घंटा वाजणार आहे. जिल्हा परिषदेची ही पहिली इंग्रजी माध्यमाची आणि केंद्रीय बोर्डावर आधारित ग्रामीण भागातील आंतरराष्ट्रीय दर्जाची शाळा ठरणार आहे. या शाळेच्या उद्‌घाटनाची घोषणा जिल्हा परिषद अध्यक्ष वीरधवल जगदाळे यांनी पत्रकार परिषदेत केली. यावेळी उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत वाघमारे, आदी उपस्थित होते. महात्मा जोतिबा फुले यांच्या १९९व्या जयंतीनिमित्त आणि त्यांच्या २००व्या जयंती वर्षाच्या प्रारंभदिनी हा सोहळा पार पडणार असल्याचे जगदाळे यांनी सांगितले.

# जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या अध्यक्षपदी डॉ. जयराज कोरपे
## उपाध्यक्षपदी रामेश्वर ठाकरे, एकत्रीतपणे काम करण्याचा दिला विश्वास....!

प्रतिनिधी १० एप्रिल



**अकोला :** दि अकोला-वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सत्ताकारणात अखेर स्पष्टता आली असून, अध्यक्षपदी डॉ. जयराज संतोषकुमार कोरपे तर उपाध्यक्षपदी रामेश्वर सुभाषराव ठाकरे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. निवडणुकीत कोणतीही चुरस न पाहता संचालक मंडळाने एकमताने कौल दिल्याने बँकेतील सत्तासंतुलन अधोरेखित झाले आहे.

गुरुवार, ९ एप्रिल रोजी सिव्हिल लाइन येथील बँकेच्या सभागृहात नवनिर्वाचित संचालकांची विशेष सभा पार पडली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून गितेशचंद्र साबळे यांनी काम पाहिले. जाहीर कार्यक्रमानुसार अध्यक्ष व उपाध्यक्ष पदासाठी अर्ज मागविण्यात आले होते. यामध्ये अध्यक्षपदासाठी डॉ. जयराज कोरपे व उपाध्यक्षपदासाठी रामेश्वर ठाकरे यांचेच अर्ज प्राप्त झाले. इतर कोणतीही उमेदवारी न आल्याने दोघांचीही बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली.

निवड प्रक्रियेदरम्यान बँकेचे संचालक डॉ. संतोषकुमार कोरपे, गोपाल काकड, अजिंक्य राऊत, कल्पना पाचपोर, अरविंद इंगोले, रामेश्वर वाघ, अनिल जाधव, जावेद उल्लाह खान, डॉ. धीरज देशमुख, उषा हिंगणकर, संदीप खारोडे, अभिषेक तिडके, धनंजय गोरे, शोभा झनक, नितीन जाधव, विश्वनाथ ताथोड, ललित बहाळे, गीता ठाकरे, अपर्णा धोत्रे आदींची उपस्थिती होती. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी अनंत वैद्य हेही यावेळी उपस्थित होते. या अविरोध निवडीमुळे बँकेच्या पुढील धोरणात्मक वाटचालीस स्थैर्य मिळणार असल्याची चर्चा सहकार वर्तुळात रंगू लागली आहे. विशेष म्हणजे, निवडणुकीत कोणताही विरोधक पुढे न आल्याने संचालक मंडळातील एकजूट पुन्हा एकदा समोर आली आहे. बिनविरोध निवडीनंतर अध्यक्ष डॉ. कोरपे व उपाध्यक्ष ठाकरे यांनी सर्व संचालकांचे आभार मानत, बँकेच्या प्रगतीसाठी एकत्रितपणे काम करण्याचा विश्वास व्यक्त केला.




CMYK CMYK

सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा
शुक्रवार, दि. १० एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# कवी अनिकेत देशमुख यांच्या 'माय माती अन् ती' काव्यसंग्रहाचे अकोटला होणार प्रकाशन

## युवा कवी निवेदक व उपक्रमशील शिक्षक म्हणून सुपरिचीत गोपालखेड येथील रहिवासी अनिकेत

जयंतराव देशमुख यांच्या 'माय माती अन् ती' या दुसऱ्या कवितासंग्रहाचे दि. १२ एप्रिल रविवार रोजी श्रद्धासागर अकोट येथे होणाऱ्या ७ व्या अ. भा. वऱ्हाडी साहित्य संमेलनामध्ये मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन होणार आहे. याआधी त्यांचा 'पाऊलखुणा' हा काव्यसंग्रह संकेत प्रकाशन अकोला कडून २०१४ ला प्रकाशित झाला होता.त्यालाही रसिकांचा भरभरून प्रतिसाद मिळाला होता. अक्षरशिल्प प्रकाशन अमरावतीकडून प्रकाशित 'माय माती अन् ती' या काव्यसंग्रहाला सुप्रसिद्ध लोककवी गीतकार सिनेपार्श्वगायक प्रशांतदादा मोरे कल्याण यांची प्रस्तावना असून, म.रा.सा.सं.मंडळाचे माजी सदस्य युवा कादंबरीकार स्तंभलेखक पुष्पराजदादा गावंडे यांची पाठराखण आहे. त्याचबरोबर सुप्रसिद्ध गझलकार नितीनदादा देशमुख यांचा शुभेच्छा संदेश आहे.




दि.१२ एप्रिल रविवार रोजी श्रद्धासागर अकोट येथे होणाऱ्या ७ व्या अ.भा.वऱ्हाडी साहित्य संमेलनामध्ये संमेलनाध्यक्षा सौ.साधनाताई काळबांडे नामवंत वऱ्हाडी साहित्यिक,स्वागताध्यक्ष ह.भ.प. श्री.वासुदेव महाराज महल्ले अध्यक्ष श्री क्षेत्र श्रद्धासागर अकोट, उद्घाटक अनिल गावंडे अध्यक्ष लोकजागर मंच, तुळशीराम बोबडे पूर्व संमेलनाध्यक्ष, ह.भ.प. शुकदास महाराज गाडेकर राष्ट्रीय कीर्तनकार, डॉ. गजानन नारे अध्यक्ष प्रभात किड्स अकोला, पुष्पराज गावंडे, प्रा. ममताताई इंगोले सदस्य संत गाडगेबाबा विद्यापीठ अमरावती, अरुणकुमार विघ्ने ज्येष्ठ साहित्यिक, मंगेश चिखले सभापती न.प.अकोट, प्रकाश गायकी कार्याध्यक्ष, श्याम ठक संस्थापक वऱ्हाडी मंच यासोबतच प्रसिद्ध गझलकार निलेश कवडे, वऱ्हाडी कवी रवींद्र दळवी, निलेश देवकर, उमेश थोरात, संदीप देशमुख व इतर अनेक मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. त्याचबरोबर नामवंत वऱ्हाडी साहित्यिक, कवी, लेखक, समीक्षक, रसिक श्रोते यांचीही या कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणात उपस्थिती राहणार आहे. 'माय माती अन् ती' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन होत असल्याबद्दल कवी अनिकेत देशमुख यांचे सर्व स्तरातून कौतुक व अभिनंदन होत आहे.

साहित्य संमेलनात साहित्यिकांची मांदियाळी असते. अतिशय उत्साही वातावरणात संमेलन पार पडते. काव्यसंग्रह तसेच विविध पुस्तिका प्रकाशित केल्या जातात. जिल्ह्यातील साहित्यिक एका व्यासपीठावर येतात. संमेलनाची तयारी सुरु झाली आहे. नवोदित आणि प्रस्थापित साहित्यिक एकत्र येऊन साहित्य विषयक चर्चा करतात. छान मेळ बसलेला असतो. साहित्यिकांना देखील आयोजनाच्या माध्यमातून पर्वणी प्राप्त झालेली असते. साहित्यातील घडामोडींची देवाण-घेवाण या आयोजनातून पाहायला मिळते.

# प्रा. संतोष कुटे यांच्या मार्गदर्शनात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त सामाजिक समता सप्ताह

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागांतर्गत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त संपूर्ण राज्यभर 'सामाजिक समता सप्ताह' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत आहे. सामाजिक समतेचा संदेश जनमानसात पोहोचवणे, समाजातील सर्व घटकांमध्ये बंधुता व ऐक्य वाढवणे आणि समताधिष्ठित समाजव्यवस्था निर्माण करण्याचा दृढ संकल्प यासाठी हा सप्ताह अत्यंत महत्त्वाचा ठरतो. या सप्ताहाचे वैशिष्ट्य म्हणजे तो केवळ औपचारिक कार्यक्रम न राहता, समाजपरिवर्तनाच्या विचारांना कृतीत उतरवण्याचा एक सशक्त प्रयत्न आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार आणि त्यांच्या समतावादी तत्वज्ञानाची अंमलबजावणी यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. राज्यभरातील बार्टी (BARTI) मार्फत प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांमध्ये देखील हा सप्ताह विशेष पद्धतीने साजरा करण्यात येत आहे.

या वर्षीच्या सामाजिक समता सप्ताहाला एक वेगळीच ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेली आहे. महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्ष, संत गाडगेबाबा यांच्या जयंती वर्षाचे औचित्य, तसेच महाड चवदार तळे सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षाचा योग या सप्ताहाला अधिक अर्थपूर्ण बनवतो.

**विनामूल्य प्रशिक्षणाची सुवर्णसंधी – वंचित विद्यार्थ्यांसाठी उपक्रम**

सामाजिक समतेच्या तत्त्वांना कृतीत उतरवण्याच्या उद्देशाने प्रा. संतोष कुटे क्लासेस यांच्या माध्यमातून एक महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात येत आहे. अनुसूचित जातीमधील अत्यंत गरीब व हलाखीची परिस्थिती असलेल्या, परंतु स्पर्धा परीक्षेची तयारी करण्याची जिद्द असलेल्या विद्यार्थ्यांसाठी ही एक मोठी संधी आहे.

या उपक्रमांतर्गत अशा विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारचे शुल्क न घेता त्यांना पोलीस व आर्मी भरती तसेच विविध स्पर्धा परीक्षांचे प्रशिक्षण पूर्णपणे विनामूल्य स्वरूपात देण्यात येणार आहे. बार्टी मार्फत होणाऱ्या प्रशिक्षण परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना सक्षम बनविणे, त्यांना योग्य मार्गदर्शन देणे आणि त्यांच्या यशाचा मार्ग सुकर करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. या माध्यमातून समाजातील वंचित घटकांपर्यंत शिक्षण व स्पर्धा परीक्षांची संधी पोहोचवण्याचा प्रयत्न केला जात आहे.



संबंधित पात्र विद्यार्थ्यांनी या प्रशिक्षण कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

सामाजिक समता सप्ताहाच्या निमित्ताने विविध कार्यक्रमांची रूपरेषा तयार करण्यात आली आहे. यामध्ये व्याख्याने, चर्चासत्रे, सांस्कृतिक कार्यक्रम, निबंध स्पर्धा, रॅली, स्वच्छता अभियान आणि जनजागृती उपक्रमांचा समावेश आहे. दिनांक ८ एप्रिल २०२६ रोजी अकोला येथील हितोपदेशक बौद्धेश्वर संस्था अकोला यांच्या माध्यमातून एक विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या संस्थेच्या अंतर्गत प्रा. संतोष कुटे क्लासेसद्वारे पोलीस व आर्मी भरती प्रशिक्षण घेत असलेल्या सुमारे ५०० विद्यार्थ्यांच्या सहभागातून हा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाचे उद्घाटन समाजातील विविध मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. कार्यक्रमाला समतादूत, विशेष पोलीस अधिकारी, गजाननराव पिंगळे आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. त्यांनी आपल्या मनोगतातून सामाजिक समतेचे महत्त्व अधोरेखित केले. अनेक विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर आधारित भाषणे केली. आजचा युवक समाजाचा कणा आहे. जर युवकांनी समतेचा विचार आत्मसात केला, तर भविष्यात एक न्याय्य आणि समताधिष्ठित समाज निर्माण होऊ शकतो. सामाजिक समता सप्ताहाच्या माध्यमातून केवळ विचार मांडले जात नाहीत, तर ते आचरणात आणण्याचा संदेश दिला जातो. समाजातील भेदभाव दूर करण्यासाठी प्रत्येकाने आपल्या पातळीवर प्रयत्न करणे आवश्यक आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला 'शिक्षण घ्या, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा संदेश आजही प्रेरणादायी आहे. शेवटी असे म्हणता येईल की, सामाजिक समता सप्ताह हा समाजातील विषमता दूर करण्यासाठी एक प्रभावी माध्यम आहे. या सप्ताहाच्या माध्यमातून आपण सर्वांनी समतेचा विचार अंगीकारून त्याची अंमलबजावणी करण्याचा संकल्प करणे आवश्यक आहे.

# व्यक्ती विशेष

## गान सरस्वती किशोरी आमोणकर



**आज जयंती**

मोगूबाई कुर्डीकर यांच्यासारख्या प्रतिभासंपन्न व लोकप्रिय गायिकेच्या पोटी किशोरीताईंचा मुंबईत जन्म झाला. १० एप्रिल १९३१ हा त्यांचा जन्मदिनांक. वयाच्या अवघ्या सहाव्या वर्षी किशोरीताईंनी पितृछत्र (वडिलांचं नाव माधवदास भाटिया) गमावलं. साहजिकच तीन मुलांचं संगोपन करण्यासाठी मोगुबाईंनाच अर्थार्जन करावं लागलं.

गायनकला किशोरीताईंच्या रक्तातच होती. संगीताची मुळाक्षरं त्यांनी आईचा हात हातात धरूनच गिरविली. मात्र पुढे अंजनीबाई मालपेकर, अन्वर हुसेन खान, शरदचंद्र आरोलकर, बाळकृष्णबुवा पर्वतकर आदी गुरूंचंही मार्गदर्शन त्यांना लाभलं. आईची शिकवणी दीर्घकाळ लाभली असती तर माझं गाणं आणखी प्रभावी झालं असतं, अशी खंत किशोरीताईंनी एका मुलाखतीत व्यक्त केली आहे. एल्फिन्स्टन कॉलेजमधून त्यांनी महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केलं. किशोरीताईंनी १९५० च्या दरम्यान व्यावसायिक कारकिर्दीस प्रारंभ केला. गानप्रतिभा रक्तातच होती. परंतु या प्रतिभेला चिंतनशील गायन व अखंड साधनेची जोड लाभली. त्यामुळेच गानसरस्वती ही उपाधी त्यांना आपसूक लाभली. शास्त्रीय तसेच उपशास्त्रीय गायन ही त्यांची बलस्थानं. ख्याल गायकीसह त्यांची ठुमरीही ऐकण्यासारखी व त्यांनी गायलेली भजनं ऐकताना ब्रह्मानंदी टाळी लागणारच. देशविदेशातील संगीत महोत्सवात त्यांनी मैफली गाजविल्या. अवघ्या भारतवर्षाला ज्या सिनेसंगीताने वेड लावलं त्यातील भावभावनांच्या आविष्काराने किशोरीताईंनाही झपाटलं होतं. (शास्त्रीय संगीतातील भावप्रधान गायकीचा प्रकार त्यांनी पुनरुज्जीवित केला असे मानले जाते.) एवढंच नव्हे तर 'गीत गाया पत्थरोंने' (१९६४) या चित्रपटाचे शीर्षकगीतही त्यांनी उत्कटपणे गायलं. हे गीत कदाचित त्यांच्या कारकिर्दीला कलाटणी देणारं ठरलं असतं. मात्र तसं घडायचं नव्हतं. एकतर मोगुबाईंना आपल्या मुलीचं सिने पार्श्वगायन रुचलं नाही. किशोरीताईंनाही चित्रपटसृष्टीचे काही वाईट अनुभव आले आणि त्या पुन्हा अभिजात संगीताच्या प्रांतात परतल्या. दरम्यान, अध्यापनक्षेत्रात नावाजलेल्या रवींद्र आमोणकर यांच्याशी त्यांचा विवाह झाला.

वेगवेगळ्या घराण्यांच्या गुरूंकडून गानसंस्कार झाले असले तरी किशोरीताईंनी आपल्या आईच्याच म्हणजे जयपूर घराण्याची गायकी जोपासली. किशोरीताईंच्या संगीतविषयक चिंतनाचा आविष्कार म्हणजे 'स्वरार्थरमणी – रागरससिद्धान्त' हा संगीतशास्त्रावरील ग्रंथ! या ग्रंथाची सिद्धता करताना त्यांनी अनेक संदर्भग्रंथांचा धांडोळा घेतला. आद्य शास्त्रकारांनी (भरतमुनी) आणि साहित्य या कलांच्या संदर्भात रससिद्धान्त मांडला. या विषयावर अनेक प्राचीन भाष्यकारांचे भाष्य-ग्रंथ उपलब्ध आहेत. किशोरीताईंनी या सिद्धान्ताचा अभ्यास करून हा सिद्धान्त शास्त्रीय संगीताच्या बाबतीतही कसा खरा ठरतो, ते लक्षात आणून दिलं आहे. हे कार्य खचितच अन्य गायकाने केलं असेल. राघवेंद्र स्वामींना गुरूस्थानी मानणाऱ्या किशोरीताईंचा पिंड आध्यात्मिकच. संत व्हायची ओढ त्यांना फार पूर्वीपासून होती. संतांना ज्याप्रकारे निर्गुण निराकाराची अनुभती येते, तशीच अनुभूती किशोरीताईंना नादब्रह्माच्या माध्यमातून वेळोवेळी आली, यात शंका नाही.

**मिळालेले मानसन्मान**

संगीत नाटक अकादमी पुरस्कार - १९८५
पद्मभूषण पुरस्कार - १९८७
संगीतसम्राज्ञी पुरस्कार - १९९७
पद्मविभूषण पुरस्कार - २००२
संगीत संशोधन अकादमी पुरस्कार – २००२
गौरव संगीत नाटक अकादमी शिष्यवृत्ती - २००९

# बिरबलाचे अश्रू

बिरबलाने एक दीर्घ निःश्वास टाकला. वेदनेची अन् पश्चात्तापाची छटा त्याच्या चेहऱ्यावरून तरळून गेली, नको असलेला, अप्रिय विचार झटकून टाकावा तशी त्याने मान हलविली अन् कसल्यातरी गहन विचारात तो पुन्हा गढून गेला. बिरबलाची कन्या सौदामिनी आपल्या पित्याचे हे रूप पहिल्यांदाच बघत होती. बिरबलाला इतके हताश, अगतिक झालेले तिने कधी बघितले नव्हते. दरबारातून आल्यापासूनच बिरबलाची चर्या उतरलेली होती. याचा अर्थ दरबारात काहीतरी अघटीत घडले असावे. नेहमी दरबारातून बिरबल यायचा तो हसत मुखाने. सौदामिनी दारातच त्याचं स्वागत करायची अन् दरबारात विशेष काय काय घडलं याची उत्सुकतेने चौकशी करायची. बिरबलही दरबारात घडलेल्या गोष्टी तिला सांगायचा. त्या जेवढ्या बिरबलाच्या चातुर्याच्या असत तेवढ्याच अकबराच्या जिज्ञासेच्या आणि लहरीपणाच्या असत. अकबराच्या नवरत्न दरबारात बिरबलाची गणना होत होती. अकबरानेच त्याला बिरबल ही पदवी दिली होती.



अकबराच्या दरबारात बिरबलाचा समावेश कसा झाला ते तिला आठवले. पंडित महेश दास भट्ट देशाटन करीत फत्तेपूर शिक्रीला आला होता.. राजा आणि त्याच्या संबंधातील घडामोडी यांबद्दल हमखास माहिती मिळणारी ठिकाणं कोणती याची चतुर असलेल्या महेश दास भट्टला कल्पना होती. म्हणूनच राजवाड्याबाहेच्या एका पानाच्या गादीवर तो विसावला होता.बादशाहा पानांच्या विड्यांचा शौकिन होता. बादशाहाची आज्ञा होईल तेव्हा त्याला पान करून देण्याची जबाबदारी एका सेवकावर होती. त्या दिवशी सेवकाने करून दिलेल्या पानातील चुन्यामुळे बादशाहाची जिभ चुरचुरली आणि बादशाहाची त्या सेवकावर खपा मर्जी झाली. संतापलेल्या बादशहाने लगेच त्या सेवकाला फर्मान सोडले.

जा, आत्ताच्या आत्ता अर्धारत्तल (पाव किलो) कळीचा चुना घेऊन ये' बादशहाच्या हुकूमानुसार तो सेवक चुना घ्यायला आला. अर्धा रत्तल (पावभर) विरजलेल्या चुन्याची त्याने केलेली मागणी पाहून पंडित महेश दासचं कुतूहल जागं झालं. त्याने चौकशी केली तेव्हा सगळा प्रकार त्या सेवकाने कथन केला. ते ऐकून महेश दासच्या मनात, बादशाहाच्या हेतूविषयीची शंका चमकून गेली आणि त्याने सेवकाला सावधगिरीचा उपाय सांगितला. कळीचा चुना घेऊन सेवक बादशहासमोर गेला तेव्हा घुश्यात असलेल्या बादशहानं त्याला सुनावलं 'आत्ताच्या आत्ता हा चुना खा' सेवक घाबरला. 'एवढा चुना खायचा म्हणजे मरणच ओढवणार' हे त्याच्या लक्षात आलं. पण 'बादशहाचा अवमान करणं म्हणजे मरणाला कवटाळणं' हे त्याला माहिती असल्यामुळे त्याच्यापुढे दुसरा पर्यायच नव्हता. दुसऱ्या दिवशी पानांच्या विड्यांचं तबक घेऊन सेवक आला तेव्हा बादशाहाला धक्काच बसला. 'तुम जिंदा हो' ? 'जी हुजूर' 'अर्धा रत्तल चुना खावून तू जिवंत कसा' ?

तेव्हा घाबरलेल्या सेवकाने काल घडलेली घटना कथन केली.... चुना आणायला आलेल्या सेवकाकडून सगळा वृत्तांत ऐकल्यानंतर पुढे काय घडणार याची चाणाक्ष महेश दासला कल्पना आली होती. त्याने सेवकाला सावध केले. हा सगळा चुना, खपा मर्जी झालेला बादशहा शिक्षा म्हणून तुला खायला लावणार, चुना खाल्यानंतर घरी जा आणि तूप पी, म्हणजे वाचशील' सेवकाने सांगितलेली गोष्ट ऐकून बादशाहा चकित झाला. हा उपाय सांगणारा नक्कीच बुद्धिमान आणि चतुर असणारच याची त्याला खात्री पटली. त्याने सेवकाला पिटाळलं. 'जा, त्याला शोधून आण' महेश दास बादशहासमोर दरबारात उभा राहिला आणि बादशहाला काही वर्षांपूर्वीचा जत्रेतला तो आठवला. उरूसाची जत्रा भरली होती. त्यानिमित्ताने कलावंतांना प्रोत्साहन म्हणून राजवाडयासमोर उत्सव आयोजित केला होता. हरहुन्नरी कलावंत आपआपल्या कलेचे प्रदर्शन करीत होते. राजवाड्याच्या सौधात बसून बादशहा कलावंतांचे खेळ बघत होता. प्रचंड गर्दी उसळली होती. जमलेले लोक टाळ्या वाजवून कलावंतांना प्रोत्साहन देत होते. एक बहुरूपी पुढे आला आणि त्याने खेळ सुरू केले. बहुरूपी एकामागोमाग खेळातील कौशल्य दाखवीत उपस्थितांची टाळी घेत होता.. यावेळी बहुरूप्याने एका बैलाचे सोंग घेतले होते. ते हुबेहुब सोंग बघून उपस्थितांनी टाळ्यांचा कडकडाट करीत पसंती दर्शविली. हा खेळ पाहणाऱ्या एका मुलाने जमिनीवरचा एक खडा उचलला अन् बैलाच्या अंगावर मारला त्या सरशी त्या बैलाची कातडी थरथरली आणि शाबासकी दर्शक ध्वनी उच्चारत त्या मुलाने आपल्या डोक्यावरची टोपी बक्षिस म्हणून त्या बहुरूप्याकडे फेकली. बादशाहा हे बघत होता. त्याने लगेच त्या मुलाला घेऊन येण्याची आज्ञा सेवकाला केली. आज्ञा होताच लगबगीने सेवकाने त्या मुलाला आणून बादशहा समोर उभे केले. बादशहाने मुलाला कुतूहलाने विचारले-

'क्या नाम है आपका' ? 'महेशदास भट्ट' 'कहाँसे हो' ?

'त्रिविक्रमपूर' 'तू खडा का मारलास' ?

'जी हुजूर, कोणत्याही जनावराच्या अंगावर काही पडले तर त्याची कातडी थरथरते. बहुरूप्याने वठविलेले सोंग अतर्बाह्य खरे वठविले आहे की नाही ते मला बघायचं होतं. त्या कसोटीवर तो उतरला. बक्षिस म्हणून मी त्याला टोपी बहाल करून त्याच्या कलेला दाद दिली.' त्या चुणचुणीत मुलाच्या अचूक निरीक्षणाचे गुणग्राहकतेचे आणि धिटपणाचे बादशाहाला कौतुक वाटले. आज इतक्या वर्षानंतर आपल्यासमोर उभा असलेला तरुण तोच असल्याचे बादशहाच्या लक्षात आले. त्याच्या चतुराईचे आणि गुणग्राहकतेचे बक्षिस म्हणून बादशहाने त्याला आपल्या दरबारात सेवेची संधी दिली. त्या दिवसापासून महेश दास बादशहाच्या दरबारात रूजू झाला. महेशदासची हुशारी, पाहून बादशहाने त्याला 'बिरबल' हा किताब बहाल केला. महेश दासची हुशारी, प्रत्येक कठिण प्रसंगातून मार्ग शोधण्याची त्याची कुशलता, समयसूचकता, सर्वसामान्यांप्रती असणारी त्याची ममत्वदृष्टी, लढाईतील त्याचा पराक्रम, या गुणांमुळे बिरबलाला, अकबराच्या दरबारातील नवरत्नांमध्ये स्थान मिळाले. दिवसेंदिवस बिरबलाच्या चातुर्याच्या कथा राज्यात आणि राज्याबाहेर पसरायला लागल्या.

लहरी असलेल्या बादशाहाच्या प्रत्येक कसोटीला आपले वडिल जन्मजात चातुर्याने कसे तोंड देतात हे सौदामिनीने अनेकदा अनुभवले होते. बादशहाशी असलेली त्यांची जवळीक, नवरत्नांमध्ये त्यांचा केलेला समावेश, हा दरबारातील अनेक सरदारांचा असूयेचा विषय होता. बादशाहाची बिरबलावर खपा मर्जी व्हावी आणि बिरबलाचा कायमचा काटा निघावा यासाठी अनेकांनी अनेकदा प्रयत्न केले होते. पण आपल्या अंगभूत चातुर्याने आणि अखंड सावधानतेने बिरबलाने ते प्रत्येक डाव उधळून लावले होते. बिरबलाने आपल्या हुशारीने अनेकांना वेळोवेळी मदत केली होती. त्यामुळे प्रजाजन अडीअडचणीला बिरबलाकडे धाव घेत असत आणि बिरबलही त्यांच्या समस्या सहजपणे सोडवत असल्याने प्रजाजनांना तो प्रिय होता. त्यांच्या मनात असणारी बिरबलाबद्दलची आदराची भावना सौदामिनीला माहिती होती. बिरबल जितका दरबारी कामात तरबेज होता तितकाच तो रणांगणातही लढवैय्या होता. अनेक मोहिमा त्याने फत्ते केल्या होत्या. दरबारातून आल्यापासूनच बिरबल अतिशय अस्वस्थ असल्याचे सौदामिनीच्या लक्षात आले. याचा अर्थ दरबारात काही तरी विलक्षण घडले असावे हे तिला जाणवले. पिताजींची अशी अवस्था व्हावी असे नेमके काय घडले असावे असा प्रश्न तिला पडला. बराचवेळ ती बिरबलाला न्याहाळत राहिली. नेहमीचा हसरा, हजरजबाबी, प्रसन्नचित्त असलेला अन् दरबारातल्या गमती जमती सांगणारा आपला पिता स्वत.. हरवला असल्याचे पाहून ती अस्वस्थ झाली. त्याच्या जवळ येत तिने विचारले-

**पिताजी काय झालं? तबियत ठिक नाही का ?'**

बिरबलाने नकारार्थी मान हलविली. तिच्याकडे न बघताच तो पुन्हा आपल्या विचारात गढून गेला. त्याच्या डोळ्याच्या कडा ओलावल्या होत्या. बिरबलाच्या डोळ्यासमोर आज घडलेला प्रसंग उभा राहिला. बादशहाच्या निरोपासरशी बिरबल पोहोचला तेव्हा महालाच्या सज्जात बादशहा बसला होता. तेथून समोरचा बगीचा दिसत होता. एरव्ही थुईथुई नाचणारा कारंजा आता बंद होता. कारंजातील मध्यभागी असलेला चौथरा उघडा पडला होता. ते न्याहाळत बादशहा आपल्याच विचारात दंग होता. बिरबलाच्या येण्याची वर्दी सेवकाने दिली तेव्हा बादशहा भानावर आला.

'बिरबल, इंन्सान को सबसे प्यारा क्या होता है।'

अपनी जान, खाविंद, क्षणाचाही विलंब न लावता बिरबल उत्तरला. 'झूट, त्यापेक्षा अनेक गोष्टी प्रिय असू शकतात.' नहीं जहाँपनाह, प्रत्येकाला प्रिय असतो तो फक्त आपला जीव.' 'कशावरून हे सत्य मानायचं ? क्या सबूत है ?'

'खाविंद, मला थोडा वेळ द्या. मी आपल्या समोरच सिद्ध करून दाखवतो. बादशहाची परवानगी घेऊन बिरबल कामाला लागला. त्याने एका सेवकाला मदाऱ्याला घेऊन येण्यासाठी पाठवलं तर दुसऱ्या सेवकावर गुप्त कामगिरी सोपवली. थोड्याच वेळात एका माकडीनीला घेऊन मदारी आला. माकडीनीचं पिलू तिला घट्ट बिलगलेलं होतं. ते पाहून बादशहाला आश्चर्य वाटलं. 'बिरबल, ये बंदरीया क्यो लाया' ? 'आप देखते जाईये, खाविंद' बिरबलाच्या आज्ञेनुसार मदाऱ्याने पिलासह माकडीनीला कारंज्याच्या हौदात सोडलं, तसं झेप घेऊन माकडीन पिलासह, कारंजाच्या मधल्या चौथऱ्यावर जाऊन बसली. बिरबलाने गुप्त कामगिरी सोपविलेल्या सेवकाने हौदात पाणी वाढवायला सुरुवात केली. तशी माकडीनीची अस्वस्थता वाढायला लागली. तेथून बाहेर पडण्याचा मार्ग शोधण्याचा ती प्रयत्न करायला लागली. त्या पाण्यातून बाहेर पडणे शक्य नसल्याचे पाहून तिने आपल्या पिलाला घट्ट कवटाळून घेतले. पाण्याची पातळी तिच्या छाती पर्यंत आली तसे तिने आपल्या पिलाला खांद्यावर घेतले.

महालाच्या सज्जात बसलेला बादशहा ते एकाग्रतेने पाहात होता. विजयी स्मित करीत तो बिरबलाला म्हणाला- देखो, देखो बिरबल, मैने कहाँ ओही सच है'। बिरबल छद्मीपणे हसला. पाण्याची पातळी वाढत वाढत तिच्या तोंडापर्यंत आली तशी ती चित्कारायला लागली. पाणी नाकापर्यंत आलं तेव्हा काही क्षण ती स्तब्ध झाली आणि पुढच्याच क्षणी तिने खाद्यावर धरलेले पिलू पायाखाली घेतले अन् त्यावर ती उभी राहिली. बिरबलाने सेवकाला खूण करून पाणी वाढवणे बंद केले. ते सगळं अवाक होऊन बादशहा बघत राहिला. त्याचा चेहरा उतरला होता, बिरबलाच्या चेहऱ्यावर नेहमीसारखे विजयी हास्य होते. बादशहाच्या महालातून बिरबल घरी जायला निघाला तेव्हा पायऱ्या उतरतांना, वीज चमकावी तसा एक विचार त्याच्या मनाला स्पर्शून गेला आणि तो थबकला. माकडीन आणि तिचं पिल्लू त्याच्या डोळ्यासमोर आलं. बादशहाला उत्तर देण्याच्या उद्देशाने आपण हे अघटीत करून बसलो याची त्याला जाणीव झाली आणि तो मनातल्या मनात कळवळला, स्वतःच्या कृत्याची त्याला घृणा वाटली. पराभूतागत खाली मान घालून तो घरी आला. पण तो विचार त्याला त्रस्त करीत होता. तोप्रसंग विसरायचा बिरबल प्रयत्न करीत होता.

डॉ. सुभाष गढीकर
पसायदान, ९६, यशवंत कॉलनी, कारंजा लाड
मोबाईल : ९८५०८२४५९०

## साहित्यिक, लेखकांना आवाहन

**दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट** आता आठ पानांसह वाचकांना उपलब्ध होत आहे. अंकातील विविधा पानासाठी अकोला शहर तसेच जिल्ह्यातील साहित्यिक, लेखक, कवी यांनी त्यांचा मजकूर **८३९०६७०९९९** या **व्हॉटसअप** क्रमांकावर पाठवावा.

त्याला यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल. या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

## जिल्हा परिषद शाळेत मतदान मॅपिंग कॅम्प

**हिवरखेड:** जिल्हा परिषद शाळेत मतदान मॅपिंग कँप आयोजित करण्यात आला होता. मतदार याद्या अपडेट करून मतदाना पासून कोणी वंचित राहू नये यासाठी कार्यक्रम राबविण्यात येत आहे. कँप द्वारे जनजागृती केली जात आहे. यामध्ये तेल्हारा तहसील, हिवरखेड नगरपरिषद कर्मचारी व बीएलओ यांनी परिश्रम घेतले. तसेच जे मतदार दुर्लक्ष करतील ते मतदाना पासून वंचित राहतील असे सांगण्यात आले. बीएलओ मतदारांच्या घरी जाऊन माहिती घेत आहेत. मतदार याद्या अपडेट करणे हा मुख्य उद्देश आहे.



## भारत विद्यालयात प्रथमच रोबोटिक्स वर्कशॉपचे आयोजन

**अकोला:** भारत विद्यालयात ८ एप्रिल ते २४ एप्रिलपर्यंत प्रथमच रोबोटिक्स वर्कशॉप चे आयोजन करण्यात आले आहे. तंत्रज्ञान व नवोपक्रमाची आवड असलेल्या हुशार विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम राबविण्यात आला आहे. हे वर्कशॉप बॉटमाईंड तर्फे आयोजित करण्यात आले असून त्याचे मार्गदर्शन एम्बेडेड सिस्टम तज्ञ प्रा. माधुरी श्रीकांत लोहकरे करत आहेत.या वर्कशॉपमध्ये विद्यार्थ्यांना स्टीम विज्ञान, तंत्र, अभियांत्रिकी, गणितीय आधारित ज्ञानासह रोबोटिक्स, ऑटोमेशन आणि बेसिक प्रोग्रामिंग यांची सखोल माहिती दिली जात आहे. विद्यार्थ्यांना रोबोटचे मूलभूत तत्त्व, सेन्सर्स व मोटर्स कसे कार्य करतात तसेच रोबोटला विविध कामे करण्यासाठी कसे प्रोग्राम केले जाते याचे प्रशिक्षण दिले जात आहे.वर्कशॉपमध्ये प्रात्यक्षिके, प्रत्यक्ष कृती उपक्रम आणि प्रॅक्टिकल सेशन्स यांचा समावेश आहे.

## मारवाडी महिला समितीचा रंगारंग पदग्रहण सोहळा संपन्न

**अकोला:** राष्ट्रीय स्तरावर कार्य करणाऱ्या अ.भा.मारवाडी महिला समितीच्या जिल्हा कार्यकारणीचा पदग्रहण सोहळा मंगळवारी स्थानीय खंडेलवाल भवनात मोठ्या उत्साहात संपन्न झाला.या सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून महापौर शारदा खेडकर, पदग्रहण अधिकारी व समितीच्या प्रांतीय अध्यक्ष उषा बाहेती, माजी प्रांतीय अध्यक्ष पद्मा दी गोयनका, नूतन अध्यक्ष संध्या अग्रवाल, नूतन सचिव दीप्ती सिकरिया, नूतन कोषाध्यक्ष हेमा खटोड, मावळत्या अध्यक्ष अनिता उपाध्याय ,मावळत्या सचिव अंजली उपाध्याय आदी उपस्थित होते.सर्वप्रथम मुलींनी लेझीम द्वारे पाहुण्यांचे वाजतगाजत स्वागत केले. यावेळी शंखध्वनी व राधा खंडेलवाल यांची प्रार्थना,दीप प्रजवलन ने या सोहळ्याला रंगारंग प्रारंभ झाला.यावेळी नृत्य कला केंद्राच्या बलिकांनी कथ्थक नृत्य सादर केले, तर महिला गृप ने देवीस्तुती वंदना गाऊन भक्तिभाव निर्माण केला.यावेळी नूतन कार्यकारणीतील समिती प्रमुखांची नारी शक्ती, राष्ट्र शक्ती हे फलक हातात घेऊन परेड काढण्यात आली.यावेळी उषा बाहेती, शारदा खेडकर, अनिता उपाध्याय, अंजली उपाध्याय, रमा चांडक, समितीच्या मार्गदर्शक डॉ तारा माहेश्वरी, चंद्रकला अग्रवाल, रेखा खंडेलवाल समवेत नगरसेविका चंदा शर्मा, किरण अग्रवाल, पद्मा आ गोयनका आदींचे स्वागत करण्यात आले.

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील दिव्यांग विभागात अनागोंदी; लाभार्थ्यांचा छळ

### लक्ष्मीदर्शनाशिवाय कामे होत नसल्याचा आरोप; सामाजिक कार्यकर्त्याची ‘आपले सरकार’ पोर्टलवर तक्रार



प्रतिनिधी १० एप्रिल

**अकोला:** स्थानिक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय (जीएमसी) येथील दिव्यांग विभागात दिव्यांग प्रमाणपत्र वितरण प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार सुरू असल्याचा खळबळजनक आरोप समोर आला आहे. येथील डॉक्टर आणि कर्मचारी दिव्यांग लाभार्थ्यांना नाहक त्रास देऊन त्यांचा मानसिक छळ करत असून, ’लक्ष्मीदर्शन’ झाल्याशिवाय प्रमाणपत्रे दिली जात नसल्याची तक्रार सामाजिक कार्यकर्ते ऋषभ काळे यांनी केली आहे. याप्रकरणी त्यांनी वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभाग, मुंबई यांच्याकडे ’आपले सरकार’ पोर्टलद्वारे ऑनलाईन तक्रार नोंदवून सखोल चौकशीची मागणी केली आहे.

दिव्यांग लाभार्थी जेव्हा ऑनलाईन प्रणालीद्वारे अर्ज भरून पुढील तपासणीसाठी विभागात जातात, तेव्हा तेथे कार्यरत कर्मचारी अमित वरणकार व मंगेश टाले हे लाभार्थ्यांना अपमानस्पद वागणूक देतात, असा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. लाभार्थ्यांच्या अर्जात जाणीवपूर्वक त्रुटी काढून त्यांना वारंवार चकरा मारण्यास भाग पाडले जाते. योग्य मार्गदर्शन करण्याऐवजी लाभार्थ्यांवर ओरडून बोलणे आणि त्यांना ताटकळत ठेवण्याचे प्रकार या ठिकाणी सर्रास घडत असल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

**यांच्या बदल्या थांबविल्या कोणी**

ज्या लाभार्थ्यांकडून आर्थिक तडजोड (लक्ष्मीदर्शन) केली जाते, त्यांना डॉक्टरांशी संगनमत करून जास्त टक्केवारीचे प्रमाणपत्र मिळवून दिले जाते, असा गंभीर आरोप करण्यात आला आहे. शासनाच्या बदली नियमानुसार तीन वर्षांपेक्षा जास्त काळ एकाच पदावर राहता येत नाही. मात्र, डॉ. विनय विरवानी, डॉ. विक्रांत इंगळे, अमित वरणकार आणि मंगेश टाले हे गेल्या अनेक वर्षांपासून एकाच विभागात ठाण मांडून बसले आहेत. हे कर्मचारी आणि डॉक्टर अनेकदा कार्यालयीन वेळेत आपल्या कक्षात गैरहजर असतात, त्यामुळे ग्रामीण भागातून आलेल्या दिव्यांगांना शोधत फिरावे लागते. या कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश निघूनही राजकीय किंवा प्रशासकीय ’सेटिंग’ लावून त्यांनी बदल्या रद्द करून घेतल्याचा दावाही तक्रारीत केला आहे.

’दिव्यांग बांधव आधीच संकटात असतात, त्यांना सन्मानाची वागणूक मिळणे अपेक्षित आहे. मात्र अकोला जीएमसीमध्ये त्यांना भ्रष्टाचाराचा सामना करावा लागत आहे. या प्रवृत्तींना आळा बसणे गरजेचे आहे.’

- **ऋषभ काळे**
(सामाजिक कार्यकर्ते)

**पारदर्शक चौकशीची मागणी**

दिव्यांग विभागात सुरू असलेल्या या मनमानी कारभारामुळे जिल्ह्यातील गरजू दिव्यांग बांधवांना प्रमाणपत्रासाठी संघर्ष करावा लागत आहे. महाराष्ट्र शासनाच्या बदली कायद्याचे उल्लंघन आणि कर्तव्यातील कसूर या मुद्द्यांवर आधारित या चारही जणांची पारदर्शक चौकशी करण्यात यावी आणि त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते ऋषभ काळे यांनी प्रशासनाकडे केली आहे. आता यावर वैद्यकीय शिक्षण विभाग काय पावले उचलते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## तेल्हारा-माळेगाव रोडवरील गौणखनिजाच्या ढिगामुळे अपघात; इशाऱ्यानंतरही प्रशासन झोपेत

प्रतिनिधी १० एप्रिल

**तेल्हारा** : तेल्हारा ते माळेगाव बाजार या मुख्य मार्गावर रस्त्याच्या मधोमध टाकून दिलेल्या गौणखनिजाच्या ढिगामुळे अखेर अपघात घडल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. विशेष म्हणजे, याच धोक्याबाबत कालच ‘दै. सिटी न्यूज सुपरफास्ट’चे तेल्हारा तालुका प्रतिनिधी विशाल नांदोकार यांनी सविस्तर बातमी प्रकाशित करून अपघाताची शक्यता व्यक्त केली होती. मात्र, प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष केल्याने आज हा अपघात घडल्याने संताप व्यक्त केला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, काही दिवसांपूर्वी अवैध गौणखनिज वाहतूक करणाऱ्यांनी कारवाईच्या भीतीने हा ढीग रस्त्याच्या मधोमध टाकून पळ काढला होता. त्यानंतर अनेक दिवस हा ढीग तसाच पडून राहिला. संबंधित विभागांना याची माहिती असूनही कोणतीही ठोस कारवाई करण्यात आली नाही. कालच प्रसिद्ध झालेल्या बातमीत या ढिगामुळे रात्रीच्या वेळी मोठा अपघात होऊ शकतो, असा इशारा देण्यात आला होता. दुर्दैवाने, हा इशारा खरा ठरत आज वाहनाचा अपघात झाला. रात्रीच्या वेळी ढीग न दिसल्याने वाहनचालकाचे नियंत्रण सुटले आणि अपघात घडला. या घटनेत वाहनाचे नुकसान झाले असून चालक किरकोळ जखमी झाल्याची माहिती आहे.



दरम्यान, या मार्गावरून दररोज प्रवास करणारे चेतन पिंजरकर यांनी सांगितले, ‘आम्ही अनेक दिवसांपासून हा ढीग पाहत आहोत. कालच बातमी आली होती, तरीही प्रशासनाने काहीच केले नाही. आता अपघात झाल्यानंतर तरी जागे होतील का? या घटनेनंतर नागरिकांनी प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त केली असून, ‘अपघात झाल्यानंतरच का कारवाई?’ असा सवाल उपस्थित केला जात आहे. तसेच, या प्रकरणातील जबाबदारांवर तात्काळ कारवाई करून रस्त्यावरील हा धोका दूर करण्याची मागणी जोर धरत आहे.

## स्थानिक आमदारांचे काहीच कर्तव्य नाही का?

प्रतिनिधी १० एप्रिल

### ◆ नागरिकांचा संतप्त सवाल

**तेल्हारा** : तेल्हारा–माळेगाव बाजार मार्गावरील गौणखनिजाच्या ढिगामुळे झालेल्या अपघातानंतर आता केवळ प्रशासनावरच नव्हे, तर स्थानिक लोकप्रतिनिधींवरही नागरिकांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. ‘स्थानिक आमदारांचे काहीच कर्तव्य नाही का?’ असा थेट सवाल संतप्त नागरिकांकडून विचारला जात आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून रस्त्याच्या मधोमध पडून असलेला धोकादायक ढीग, त्यावर प्रसिद्ध झालेली बातमी आणि त्यानंतरही कोणतीही हालचाल न झाल्याने नागरिकांचा संयम सुटला आहे. अपघात झाल्यानंतरच यंत्रणा जागी होत असेल, तर लोकप्रतिनिधींची भूमिका नेमकी काय, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. स्थानिक नागरिकांनी म्हटले, कि, प्रशासनाची जबाबदारी आहेच, पण आमदारांनीही अशा प्रश्नांवर लक्ष देणे गरजेचे आहे. आम्ही सामान्य नागरिक रोज या रस्त्याने जीव मुठीत घेऊन प्रवास करतो. मग आमचे प्रश्न मांडणारा आणि सोडवणारा कोण?

नागरिकांचे म्हणणे आहे की, रस्ते सुरक्षा, अवैध उत्खनन आणि सार्वजनिक सुरक्षेसारख्या गंभीर विषयांवर लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेणे अपेक्षित असते. मात्र, या प्रकरणात कोणतीही ठोस भूमिका दिसून न आल्याने नाराजी वाढत आहे. दरम्यान, नागरिकांनी प्रशासनासोबतच स्थानिक आमदारांनीही तात्काळ हस्तक्षेप करून संबंधितांवर कारवाई करावी आणि रस्त्यावरील धोका दूर करावा, अशी मागणी केली आहे. आता प्रश्न असा उभा राहतो अपघातानंतरच हालचाल का? आणि नागरिकांच्या सुरक्षेसाठी लोकप्रतिनिधी कधी पुढे येणार?

## गोरेगाव खुर्द व बुद्रुक गावांसाठी नवीन डीपी मंजूर

प्रतिनिधी १० एप्रिल

### ◆ आमदार सावरकर यांचा यशस्वी पाठपुरावा

**अकोला:** तालुक्यातील गोरेगाव खुर्द व गोरेगाव बु. या गावांमध्ये डि.पी. वर लोड येत असल्यामुळे रहिवाशांना उन्हाळ्यात होल्टेजची समस्या जाणवत होती. आमदार रणधीर सावरकर यांनी महावितरण अधिका-यांशी चर्चा करून प्रश्न सोडवला.

भाजपाचे कार्यकर्ते नरेंद्र वाकोडे, अशोक भिसे, आकाश साबे, मनोज भागवत, पंजाब भागवत, विजय ढोरे, लांडे यांनी ही समस्या आमदार रणधीर सावरकर यांना सांगितली. त्यांनी कार्यकारी अभियंता सपकाळ यांच्याशी बैठकीत चर्चा केली. दोन्ही गावात




नवीन डी.पी. बसवण्याचे आदेश आमदार रणधीर सावरकर यांनी दिले. बैठकीला भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष शंकरराव? वाकोडे, भाजपाचे जिल्हा सरचिटणीस अंबादास उमाळे, भाजपा ओबिसी आघाडीचे जिल्हाध्यक्ष मनीष गावंडे, भाजपाचे आकाश साबे यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी उपस्थित होते.

## सडक सुरक्षा जीवन रक्षा फलकाचे अनावरण

प्रतिनिधी १० एप्रिल

### ◆ रोटरी व्हीजनने दिला रस्ता सुरक्षेचा संदेश

**अकोट:** अकोट रोटरी व्हिजन सामाजिक क्षेत्रात काम करत असुन गेल्या कित्येक वर्षा पासुन रस्ता सुरक्षा बददल जनजागृती अभियान , रस्ता सुरक्षा सप्ताह , अपघात विमा जनजागृती अभियान असे अनेक प्रकल्प पोलीस स्टेशन च्या सहकार्याने राबविण्यात येतात. सडक सुरक्षा जीवन रक्षा हा संदेश देणारा फलक वैभव बायोटेक समोर, अंजनगांव रोड तथा अकोला रोड वर रोटरी डिस्ट्रिक्ट ३०३० चे डिसट्रीक्ट् गव्हर्नर ज्ञानेश्वर शेवाळे , डॉ.ऋषीकेश येऊल, असिस्टंट गव्हर्नर अनिल अग्रवाल , सुनिल घोडके , नंदकिशोर शेगोकार, यांचे




शुभ हस्ते करण्यात आले. हया फलका मार्फत हेल्मेट जनजागृती , रस्ता सुरक्षते बददल ह्या फलका मार्फत नेहमी जनजागृती होईल त्यामुळे निश्चितच अपघाताचे प्रमाण कमी होऊन लोकांचे प्राण वाचतील.

हया स्थायी प्रकल्पाकरिता शेतकरी मोटर्स व पुजा टायर्स प्रायोगिकता देऊन सामाजिक बांधिलकी जोपासली. ह्या प्रकल्पाकरिता रोटरी व्हिजन चे अध्यक्ष आनंद भोरे सचिव अतुल मालाणी , निर्वाचीत अध्यक्ष संदीप भुस्कट , संजय बोरोडे, अनंतराव काळे, विजय नवले, प्रविण बनसोड, सचिन भुस्कट, भुषण नेमाडे, बाबुराव झामरे, प्रकाश बिहाडे, अभिजीत अग्रवाल यांनी विशेष प्रयत्न् केले अशी माहीती रोटरीचे जनसंपर्क अधिकारी कल्पेश गुलाहे कळवितात.

# शहराच्या विकासासाठी कोट्यवधींच्या निधीचे नियोजन

प्रतिनिधी १० एप्रिल

**अकोला :** अकोला महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा आज, १० एप्रिल २०२६ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात पार पडली. या सभेमध्ये शहराच्या पायाभूत सुविधा, स्वच्छता आणि विकास प्रकल्पांच्या अनुषंगाने अनेक महत्त्वाचे विषय चर्चेला आले.

सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी विविध योजनांतर्गत निधीचे नियोजन करण्यावर चर्चा करण्यात आली. यामध्ये नगरोत्थान महाअभियान (५० कोटी), दलितेत्तर वस्ती सुधार (५० कोटी), लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना (३० कोटी) आणि विशेष निधी (अंदाजे ५० कोटी) अशा एकूण मोठ्या निधीच्या नियोजनावर निर्णय घेण्यात आला.

तसेच शहराला ’वाटर प्लस’ मानांकन मिळवण्यासाठी सार्वजनिक शौचालयांची दुरुस्ती आणि नवीन बांधकामांसाठी सल्लागार संस्थेची नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आली. शासन निर्णयानुसार शहरात हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोक कल्याण अभियान राबवणे आणि त्यांतर्गत विकासकामे प्रस्तावित करण्याबाबत सभेने सकारात्मक चर्चा केली. यापूर्वी झालेल्या सर्वसाधारण सभा क्र. २, ३, ४ आणि विशेष सभा क्र. ५ चे इतिवृत्त आजच्या सभेत कायम करण्यात आले. सदर सभेचे आयोजन महानगरपालिका नगर सचिव अमोल डोईफोडे यांच्या स्वाक्षरीने काढलेल्या नोटीसनुसार करण्यात आले होते.

**खाजगी शाळांना टक्कर देणाऱ्या शाळा असाव्यात**

केवळ भव्य इमारती असून चालणार नाही, तर खाजगी शाळांप्रमाणेच सरकारी शाळांमध्ये डिजिटल शिक्षण, अद्ययावत प्रयोगशाळा आणि ई-लर्निंग सुविधा असणे काळाची गरज आहे. स्पर्धेत टिकण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर अनिवार्य आहे. खाजगी शाळांमधील शिक्षक ज्याप्रमाणे विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी उत्तरदायी असतात, तशीच बांधिलकी इतर शाळांमधील शिक्षकांमध्ये निर्माण होणे गरजेचे आहे. शिक्षकांना आधुनिक अध्यापन पद्धतींचे वेळोवेळी प्रशिक्षण मिळणे आवश्यक आहे. पालक खाजगी शाळांकडे आकर्षित होण्याचे एक मुख्य कारण म्हणजे तिथल्या सुविधा (उदा. क्रीडांगण, स्वच्छतागृहे, पिण्याचे शुद्ध पाणी). जर या सुविधा सरकारी शाळांत चांगल्या दर्जाच्या मिळाल्या, तर सामान्य पालक पुन्हा या शाळांकडे वळतील.

- **ॲड. गिरीश गोखले** नगरसेवक भाजप

## रेल्वे स्टेशनवर आढळला अनोळखी इसमाचा मृतदेह

वि. प्रतिनिधी १० एप्रिल

**अकोट :** ०९ एप्रिल रोजी दुपारी शहर पोलिस स्टेशन हद्दीतील रेल्वे स्टेशन परिसरात एका अनोळखी इसम मृतावस्थेत आढळून आला. याबाबत रेल्वे गँगमन शेख सिराजउददीन शेख चिरागोददीन, रा. रेल्वे क्वॉर्टर अकोट यांनी पोलीस स्टेशन अकोट शहर येथे येऊन माहिती दिली. त्यांच्या तक्रारीवरून पोलीस स्टेशन अकोट शहर येथे अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली.



मृतक अंदाजे ५० वर्ष वयाचा असून उंची सुमारे ५ फूट ५ इंच आहे. त्याची दाढी वाढलेली असून अंगात पांढऱ्या व हिरव्या रंगाच्या पट्ट्यांचा शर्ट तसेच गडद हिरव्या रंगाची हाफ नाईट पॅन्ट परिधान केलेली आहे. सदर मृत व्यक्तीची अद्याप ओळख पटलेली नसून त्याचे कोणतेही नातेवाईक पुढे आलेले नाहीत. मृतदेह पोस्टमार्टमसाठी ग्रामीण रुग्णालय अकोट येथे ठेवण्यात आला आहे. दरम्यान, संबंधित अनोळखी मृतकास कोणी ओळखत असल्यास त्यांनी पोलीस स्टेशन अकोट शहर, जि. अकोला येथे संपर्क साधावा, असे आवाहन पोलीस प्रशासनाकडून करण्यात आले आहे. पोलिस निरीक्षक अमोल माळवे, उपनिरीक्षक भाऊसाहेब गोपाळघरे, पो.हे.कॉ. अमोल दाळु यांच्याशी मो. नं. ८६०५११७१०० / ८६२३०७५०८२ वर संपर्क साधावा.

## तालुका शिक्षण समन्वय समितीची त्रैमासिक सभा उत्साहात

प्रतिनिधी १० एप्रिल

**मूर्तिजापूर:** तालुक्यातील शिक्षणाच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असलेल्या तालुका शिक्षण समन्वय समितीची त्रैमासिक सभा आज दिनांक ९ एप्रिल रोजी शासकीय विश्रामगृह येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. सभेच्या अध्यक्षस्थानी आमदार हरिषभाऊ पिंपळे उपस्थित होते.

सभेच्या प्रारंभी गटविकास अधिकारी तथा सदस्य सचिव मिलिंद मोरे यांनी समितीच्या वतीने अध्यक्षांचा सत्कार केला. तसेच नगराध्यक्ष हर्षल साबळे यांचा गटशिक्षणाधिकारी वैशाली रामटेके यांच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन गौरव करण्यात आला. समिती सदस्य प्रशांत हजारी यांच्या उद्योजक म्हणून झालेल्या यशस्वी कामगिरीबद्दल आमदार पिंपळे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील शाळांना नियमित भेटी देऊन पाहणी करावी व शाळांचा दर्जा उंचावण्यासाठी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे निर्देश देण्यात आले. तसेच शालेय वेळेत शिक्षक अनुपस्थित आढळल्यास कठोर कारवाईचा इशाराही देण्यात आला.



तालुक्यातील आदर्श शाळांचा अनुभव इतर शाळांपर्यंत पोहोचावा यासाठी शिक्षक भेटींचे नियोजन करण्याचे ठरविण्यात आले. जिल्हा परिषद माध्यमिक शाळा माना येथील शिक्षकांनी कमी मनुष्यबळातही उत्कृष्ट कामगिरी करून ‘मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा’ अभियानांतर्गत ११ लाखांचे बक्षीस प्राप्त केल्याबद्दल मुख्याध्यापक गजानन गिरी यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

प्राथमिक शिक्षणाचा मजबूत पाया घालण्यासाठी अंगणवाडीतून गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यावरही भर देण्यात आला. जिल्हा परिषद शाळा मधापुरी येथे आमदार हरिषभाऊ पिंपळे यांच्या प्रयत्नातून नववी वर्गास मंजुरी मिळाल्याबद्दल सभेत अभिनंदनाचा ठराव मांडण्यात आला. सभेच्या शेवटी पुढील बैठक जून महिन्यात घेण्यात यावी असे निर्देश दिले.समिती सदस्य बंडूभाऊ डाखोरे यांनी पुढील सभा माझ्या हिवरा कोरडे येथे घेण्याची विनंती केली ती अध्यक्षांनी मान्य केली.

सभेत उपविभागीय अधिकारी संदीपकुमार अपार, तहसीलदार शिल्पा बोबडे, विद्युत विभागाचे कदम, तालुका आरोग्य अधिकारी कराळे, बालविकास अधिकारी राठोड, शिक्षण विस्तार अधिकारी संजय मोरे, भारतीय जनता पक्षाचे तालुका अध्यक्ष नंदकिशोर राऊत, समिती सदस्य बंडू डाखोरे, प्रशांत हजारी, संतोष भांडे, साहेबराव राऊत, संदीप जळमकर, आकाश मोहिते, गजानन गिरी, कैलास सोळंके, प्रमोद उपाध्ये, सौ शुभांगी मेहरे, सौ सविता ठाकरे, साबळे, निखिल दिंडोकर, आमदार चे स्विस सहायक सुधीर दुबे, योगेश फुरसुले, अकिल खान इत्यादी उपस्थित होते.. संपूर्ण सभेचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन मोहम्मद इब्राहिम अली यांनी केले.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
शुक्रवार, दि. १० एप्रिल २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# आयपीएल सट्ट्यावर धाड

## एकास अटक, ५० हजारांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी १० एप्रिल




**यवतमाळ** : शहरातील कॉटन मार्केट परिसरात सुरू असलेल्या आयपीएल सट्ट्यावर स्थानिक गुन्हे शाखेने बुधवारी (८ एप्रिल) छापा टाकून एका इसमाला अटक केली. या कारवाईत सुमारे ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

रोशन गोपाल पुरोहित असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. तो आपल्या राहत्या घरी मोबाईल व संगणकीय उपकरणांच्या साहाय्याने आयपीएल सामन्यांवर सट्टा घेत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी पंचांसमक्ष धाड टाकली असता, तो दिल्ली कॅपिटल्स व गुजरात टायटन्स यांच्यातील सामन्यावर सट्टा चालवत असल्याचे निष्पन्न झाले.

कारवाईदरम्यान आरोपीकडून चार अँड्रॉइड मोबाईल, डेल कंपनीचा मॉनिटर, किबोर्ड असा ४६,५५० रुपयांचा मुद्देमाल तसेच ४ हजार रुपये रोख जप्त करण्यात आले. एकूण ५०,५५० रुपयांचा ऐवज पोलिसांनी ताब्यात घेतला. या प्रकरणी आरोपीविरुद्ध जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपासासाठी त्याला यवतमाळ शहर पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंथा, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात व पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि मनीष गावंडे, पोउपनि गजानन राजमल्लू, सफौ/सैयद साजीद, योगेश गटलेवार, पोहवा/२२२ अजय डोळे, पोहवा/प्रशांत हेडाउ, पोहवा/रूपेश पाली, पोहवा/योगेश डगवार, पोशि/सुनील पैठणे, पोशि/देवेंद्र होले, पोशि/आकाश सूर्यवंशी या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली.

# यवतमाळ बसस्थानकावर 'बॉम्ब'?



प्रतिनिधी १० एप्रिल



**यवतमाळ** : यवतमाळ येथील बसस्थानक परिसरात गुरुवारी सकाळी संशयास्पद बॅगमध्ये बॉम्ब आढळल्याची माहिती मिळताच काही काळासाठी खळबळ उडाली. मात्र पोलीस दलाच्या नियोजित रंगीत तालीमेचा भाग असल्याचे नंतर स्पष्ट झाले.

यवतमाळ बसस्थानकावरील वाहनतळ परिसरात बॉम्बसदृश वस्तू असल्याची माहिती पोलीस नियंत्रण कक्षाला मिळताच पोलीस, बॉम्ब शोधक व नाशक पथक, श्वान पथक तसेच फॉरेन्सिक विभाग तातडीने घटनास्थळी दाखल झाले. सुरक्षेच्या दृष्टीने परिसर रिकामा करण्यात आला आणि नागरिकांना सुरक्षित स्थळी हलविण्यात आले. त्यानंतर संशयित बॅग विशेष तांत्रिक साधनांच्या मदतीने ताब्यात घेऊन ती सुरक्षित ठिकाणी नेण्यात आली. पुढे नियंत्रित पद्धतीने ती निष्क्रिय करण्यात आली. या दरम्यान वाहतूक विस्कळीत होऊ नये यासाठी स्वतंत्र पोलीस पथक कार्यरत होते. कारवाई पूर्ण झाल्यानंतर संबंधित प्रकार हा मॉक ड्रिलचा भाग असल्याचे जाहीर करण्यात आले. दहशतवादी हल्ला किंवा बॉम्बस्फोटाच्या प्रसंगी पोलीस यंत्रणा किती तत्परतेने काम करते, याची चाचणी घेण्यासाठी ही तालीम आयोजित करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली.

पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, पोलीस उपअधीक्षक सुनिल हुड व एसडीपीओ दिनेश बैसाने यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई पार पडली. नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता कोणतीही संशयास्पद माहिती त्वरित पोलिसांना कळवावी, असे आवाहन करण्यात आले.

## आमणी खुर्द येथे बॅनर फाडले; परिसरात तणाव

प्रतिनिधी १० एप्रिल

**महागाव** : आमणी (खुर्द) येथे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त लावण्यात आलेल्या बॅनर अज्ञात समाजकंटकाने फाडल्याची संतापजनक घटना घडली. या प्रकारामुळे आंबेडकरी अनुयायांच्या भावना दुखावल्या असून परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

माहितीनुसार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर युवा प्रतिष्ठानच्या वतीने गावातील मुख्य चौकात जयंतीनिमित्त बॅनर लावण्यात आले होते. बुधवारी (दि. ८ एप्रिल) रात्री ९ ते ९.३० वाजण्याच्या सुमारास अज्ञात इसमाने बॅनरवर दगडफेक करून त्याचे विद्रुपीकरण केले.

घटनेची माहिती मिळताच गावातील नागरिकांनी घटनास्थळी गर्दी केली. या घटनेविरोधात संताप व्यक्त करण्यात येत असून तणावाची स्थिती निर्माण झाली आहे. प्रतिष्ठानचे अध्यक्ष संघर्ष गजानन रोकडे यांनी तत्काळ महागाव पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दिली. त्यानुसार पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम २९८ अन्वये अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. तक्रार देताना उपाध्यक्ष आशिष काळबांडे, अतुल रोकडे, प्रशांत मोरे, सूरज सांगडे, सम्यक काळबांडे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. या प्रकरणाचा पुढील तपास ठाणेदार धनराज निळे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि अंबुरे करीत असून, दोषींचा लवकरच शोध घेऊन कठोर कारवाई करण्यात येईल, असे पोलिसांनी सांगितले. तसेच नागरिकांनी शांतता राखावी, असे आवाहनही प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# महागावात दारूवर 'दुहेरी' धोरण?

## एका दुकानाला विरोध, दुसऱ्याला मूक संमती; आंदोलनाचा इशारा

प्रतिनिधी १० एप्रिल

**महागाव** : शहरातील दारू दुकानांच्या मुद्द्यावरून महागावमध्ये सध्या वातावरण तापले असून नागरिकांनी लोकप्रतिनिधी व प्रशासनाच्या भूमिकेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. एका दारू दुकानाला तीव्र विरोध होत असताना दुसऱ्या दुकानाला मात्र छुपे पाठबळ दिले जात असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे.

दुसरीकडे, प्रभाग क्रमांक १७ मध्ये सुरू असलेल्या दारू दुकानाबाबत मात्र प्रशासन व काही स्थानिक नेते 'मूक संमती' देत असल्याची चर्चा रंगली आहे. त्यामुळे "नियम सर्वांसाठी सारखे की सोयीनुसार?" असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत.

> ■ प्रभाग क्रमांक १ मध्ये नव्याने सुरू झालेल्या दारू दुकानाविरोधात स्थानिक महिलांनी तीव्र आक्रमक भूमिका घेतली आहे. रहिवासी परिसराच्या अगदी जवळच तसेच स्व. वसंतराव नाईक यांच्या तैलचित्राजवळ दुकान सुरू केल्याने नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. या ठिकाणी शांतता भंग होत असल्याची तक्रार महिलांनी केली असून, त्वरित दुकान हटविण्याची मागणी करण्यात आली आहे. अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही महिलांनी दिला आहे.

शाळा, मंदिरे व वस्तीपासून ठराविक अंतराचे नियम एका ठिकाणी काटेकोरपणे लागू होतात, तर दुसऱ्या ठिकाणी शिथिल का केले जात आहेत, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. या संपूर्ण प्रकरणामागे आर्थिक हितसंबंध असल्याचीही चर्चा शहरात सुरू आहे. दरम्यान, प्रशासनाने याबाबत स्पष्ट भूमिका घेतली नाही, तर महिला मंडळ व नागरिक रस्त्यावर उतरून आंदोलन छेडतील, असा इशारा देण्यात आला आहे. "दारू नको" ही भूमिका असेल, तर ती सर्वत्र समानपणे लागू करावी, अन्यथा दुटप्पीपणा सहन केला जाणार नाही, असा ठाम इशारा नागरिकांनी दिला आहे.

या पार्श्वभूमीवर आता प्रशासन काय भूमिका घेते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# १४ किमीचा फेरा टाळण्यासाठी शेतकऱ्यांची झुंज

प्रतिनिधी १० एप्रिल

**आर्णी** : अंतरगाव ते आर्णी दरम्यानचा बहुप्रतीक्षित रस्ता अद्यापही कागदावरच अडकून पडल्याने परिसरातील शेतकऱ्यांचा संताप वाढत आहे. अवघ्या चार किलोमीटर अंतरासाठी सध्या १४ किलोमीटरचा फेरा मारावा लागत असल्याने शेतकऱ्यांना आर्थिक व शारीरिक दोन्ही प्रकारचा मोठा फटका बसत आहे.

> अंतरगाव-आर्णी रस्ते काम रखडले

या मार्गालगत शेकडो एकर शेती असून दररोज शेतकऱ्यांची ये-जा याच रस्त्यावरून होते. मात्र पावसाळ्यात हा रस्ता पूर्णपणे बंद पडत असल्याने चार महिने शेतात जाणेही कठीण होते. त्यामुळे शेतीचे मोठे नुकसान सहन करावे लागत असल्याची व्यथा शेतकऱ्यांनी मांडली. या संदर्भात अनेक वेळा निवेदने देण्यात आली असून शेतकऱ्यांची संमतीपत्रेही प्रशासनाकडे सादर करण्यात आली आहेत. तरीही केवळ पाहणी व पंचनाम्यांपुरतीच कार्यवाही होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. दरम्यान, प्रशासनाने तातडीने रस्त्याचे काम हाती घ्यावे, अन्यथा उग्र आंदोलन छेडण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे. यासंदर्भात तहसीलदार वैशाख वाहूर वाघ यांना निवेदन देण्यात आले. निवेदन देताना जाकीर सोलंकी, अतुल मुनगिनवार, अभी वाठोरे, समीर साकले, जमीर साकले, प्रशांत चव्हाण, उदय राठोड यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उमरखेडमध्ये 'SIR मॅपिंग' कॅम्प; तांत्रिक नोंदी अद्ययावत

प्रतिनिधी १० एप्रिल



**उमरखेड** : उमरखेड नगर परिषद अंतर्गत प्रभाग क्रमांक १ मध्ये नागरिकांच्या सोयीसाठी आयोजित 'SIR मॅपिंग' विशेष कॅम्पला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. भारतीय जनता पार्टीच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हा समन्वयक नितीन भुतडा यांच्या सहकार्याने नगरसेवक इंजी. सुरेंद्र कोडगीरवार यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात आला.

प्रभागातील शेकडो नागरिकांनी कॅम्पला उपस्थित राहून SIR मॅपिंगची प्रक्रिया पूर्ण करून घेतली. नागरिकांना कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी आयोजकांकडून नियोजनबद्ध व्यवस्था करण्यात आली होती.

हनुमान वॉर्डमधील श्रीहरी सुपर मार्केटच्या आवारात पार पडलेल्या या कॅम्पमध्ये दिवसभर नागरिकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. उपस्थितांना मॅपिंग प्रक्रियेचे महत्त्व समजावून सांगण्यात आले तसेच त्यांच्या तांत्रिक नोंदी अद्ययावत करण्यात आल्या.

यावेळी कैलास शिंदे, संतोष कंठले, संदीप साळवे, दिगंबर मोरे तसेच बी.एल.ओ. टोंगे सर उपस्थित होते. केंद्र प्रमुख राहत अन्सारी यांचेही सहकार्य लाभले.

हा उपक्रम प्रभागातील नागरिकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरला असून अशा प्रकारचे कॅम्प भविष्यातही राबविण्यात येतील, असे मत नगरसेवक इंजी. सुरेंद्र कोडगीरवार यांनी व्यक्त केले.

# आयएएस, आयपीएस अधिकारी साधणार तरुणांशी थेट संवाद

## 'युवा संवाद' उपक्रम; २१ एप्रिलपासून बचत भवनमध्ये साप्ताहिक सत्रे

प्रतिनिधी १० एप्रिल



**यवतमाळ** : जिल्ह्यातील तरुणांना स्पर्धा परीक्षा व करिअर मार्गदर्शनाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी 'युवा संवाद' हा उपक्रम सुरू करण्यात येणार असून आयएएस, आयपीएस व आयएफएस अधिकारी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधणार आहेत. अशी माहिती जिल्हाधिकारी विकास मीना यांनी पत्रकार परिषदेत दिली.

२१ एप्रिल २०२६ पासून यवतमाळ येथील बचत भवन येथे दर सोमवारी या सत्रांचे आयोजन करण्यात येणार आहे. प्रत्येक सत्रात अधिकारी आपले अनुभव, यशोगाथा आणि स्पर्धा परीक्षांबाबत व्यावहारिक मार्गदर्शन विद्यार्थ्यांना देणार आहेत. कार्यक्रमात पहिल्या तासात मार्गदर्शन तर दुसऱ्या तासात प्रश्नोत्तरांचे सत्र होणार असून विद्यार्थ्यांच्या शंकांचे थेट निरसन केले जाणार आहे. या उपक्रमातून यूपीएससी, एमपीएससी, बँकिंग, एसएससी तसेच इतर स्पर्धा परीक्षांबाबत जागरूकता वाढविण्यावर भर दिला जाणार आहे. या उपक्रमासाठी ८०० पासेसची मर्यादा निश्चित करण्यात आली असून प्रवेश पूर्णपणे विनामूल्य असणार आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी पूर्वनोंदणी करणे आवश्यक असल्याचेही जिल्हाधिकारी विकास मीना यांनी यावेळी स्पष्ट केले.

# आकसापोटी दाखल गुन्हे मागे घ्या

प्रतिनिधी १० एप्रिल




शिंदे सेनेचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

**उमरखेड** : तालुक्यातील अवैध धंद्यांविरोधात तक्रार केल्याच्या रागातून युट्यूब चॅनलचे पत्रकारावर गंभीर गुन्हे दाखल करण्यात आल्याचा आरोप करत ते गुन्हे मागे घ्यावेत, अशी मागणी शिवसेना (शिंदे) पक्षाने केली आहे. यासंदर्भात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना उपविभागीय अधिकाऱ्यांमार्फत निवेदन पाठविण्यात आले आहे.

पत्रकार अमित देशमुख यांना 12 मार्च रोजी रात्री पोलिस स्टेशनमध्ये एका तक्रारकर्त्याने बोलावल्याने ते पत्रकार म्हणून माहिती घेण्यासाठी गेले होते. यावेळी ठाणेदार शंकर पांचाळ यांनी त्यांच्याशी वाद घालत शासकीय कामात अडथळा, जातीय तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न व पोलिसांविषयी अप्रिती निर्माण करण्यासारखे गंभीर गुन्हे दाखल केल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. अमित देशमुख यांनी 10 मार्च रोजी जिल्हा पोलीस अधिक्षकांकडे उमरखेडमधील अवैध दारू विक्री, गांजा, गुटखा व जुगार आदी धंद्यांविरोधात तक्रार केली होती. तसेच या संदर्भात त्यांनी आपल्या युट्यूब चॅनलवर वृत्त प्रसिद्ध केले होते. याचाच राग मनात ठेवून कारवाई करण्यात आल्याचा आरोप शिवसेनेने केला आहे.

या प्रकरणाची वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून निष्पक्ष चौकशी करून संबंधितांवरील गुन्हे मागे घ्यावेत व न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. यावेळी संपर्क प्रमुख चितांगराव कदम, शहर प्रमुख अॅड. संजीवकुमार जाधव, तालुका प्रमुख प्रविण पाटील मिराशे, विधानसभा समन्वयक दत्तदिगंबर वानखेडे, तालुका समन्वयक रविकांत रुडे, संतोष जाधव, कपील चव्हाण, कैलास कदम, सपना चौधरी, प्रा. डॉ. प्रदीप इंगोले आदींसह शिवसैनिक उपस्थित होते.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे आधुनिक भारताचे शिल्पकार : जगदीश ओहोळ

प्रतिनिधी १० एप्रिल




**पुसद** : भारतीय संविधानाचे निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ एका समाजापुरते मर्यादित नसून संपूर्ण देशाचे उद्धारक आहेत. त्यांच्या कार्यामुळे आधुनिक भारताची पायाभरणी झाली असून आजच्या पिढीने त्यांचे विचार समजून घेणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध व्याख्याते तथा 'जग बदलणारा बापमाणूस' या पुस्तकाचे लेखक जगदीश ओहोळ यांनी केले.

पुसद येथे आयोजित धम्मक्रांती प्रज्ञापर्व कार्यक्रमातील दुसऱ्या पुष्पात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. प्रशांत वासनिक होते. प्रमुख अतिथी म्हणून राजूभाऊ सोळंके, संजय राठोड, सुनील भालेराव, दिलीप पारध, डॉ. रामचंद्र राठोड, प्रभाकर टेटर, मिलिंद जाधव, अरुण मनवर, गजानन जाधव, दीपक काळे, ऋषिकेश पंडितकर, सतीश नांदगावकर, श्रीराम पवार, ज्ञानेश्वर तडसे, विश्वास भवरे, देवेंद्र खडसे, दिगंबर वसेकर, आरिफ अहमद आदी उपस्थित होते. तसेच प्रज्ञापर्वाचे अध्यक्ष प्रा. सुनील खाडे यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी समता महिला मंडळ व लुंबिनी महिला मंडळ यांच्या वतीने सामाजिक बुद्ध वंदना सादर करण्यात आली. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैशाली रेवसे यांनी केले, तर आभार प्रदर्शन उषा राजेश ढोले यांनी मानले. या कार्यक्रमाला पुसद तालुक्यातील बहुजन समाज, बौद्ध धम्म बांधव, महिला, युवक व ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, १० एप्रिल रोजी यशवंत स्टेडियम, पुसद येथे 'जागर समतेचा' या काव्य-नाट्य-संगीतमय आंबेडकरी शाहिरी जलशाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून, त्याला उपस्थित राहण्याचे आवाहन प्रज्ञापर्व समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# नन्हे सितारे स्पर्धेत चातारीच्या अनुश्रीची चमक

प्रतिनिधी १० एप्रिल



**उमरखेड** : तालुक्यातील शेवटच्या टोकावर असलेल्या चातारी येथील जिल्हा परिषद प्राथमिक कन्या शाळेने गुणवत्तेची परंपरा कायम राखत पुन्हा एकदा आपली छाप पाडली आहे. 'नन्हे सितारे' जिल्हास्तरीय स्पर्धेत इयत्ता दुसरीतील अनुश्री गजानन माने हिने तृतीय क्रमांक पटकावत उल्लेखनीय यश मिळविले.

ओपन लिंक फाउंडेशनतर्फे आयोजित या स्पर्धेसाठी तालुक्यातून २२ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली होती. त्यामध्ये चातारी कन्या शाळेच्या पाच विद्यार्थिनींचा समावेश होता. स्वरा पसलवाड, अनुश्री माने, मनस्विनी वाठोरे, जान्हवी माने व स्वरा धात्रक यांनी जिल्हास्तरावर सहभाग नोंदविला.

अनुश्रीच्या यशाबद्दल तिला जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी त्यांनी अनुश्रीशी संवाद साधत तिचे कौतुक केले.

या यशामागे शिक्षक योग्यश्री घोडके व अनुप्रिया शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. अनुश्रीच्या यशाबद्दल मुख्याध्यापक विनायक वानखेडे, शिक्षक, शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, पालक व ग्रामस्थांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

सिटी न्यूज अमरावती

शुक्रवार, दि. १० एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# भारतीय डाक विभागात विमा एजंट पदासाठी २१ एप्रिलला मुलाखती

**अमरावती:** भारतीय डाक विभागाकडून डाक जीवन विमा योजनेंतर्गत अमरावती जिल्ह्यासाठी विमा एजंट नेमण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली असून इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. या पदासाठी उमेदवाराचे वय मुलाखतीच्या दिवशी १८ वर्षांपेक्षा कमी नसावे तसेच उमेदवार किमान इयत्ता दहावी किंवा बोर्डाची समतुल्य परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. उमेदवारांची निवड ही त्यांचे व्यावसायिक कौशल्य, व्यक्तिमत्व, संवाद कौशल्य, जीवन विम्याबाबतचे ज्ञान आणि मुलाखतीत मिळणाऱ्या गुणांच्या आधारावर केली जाणार आहे. निवड झालेल्या उमेदवारास ५ हजार रुपयांची अनामत रक्कम सुरक्षा ठेव म्हणून एनएससी किंवा केव्हीपीच्या स्वरूपात ठेवावी लागेल. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर डाक विभागाकडून सुरुवातीला तात्पुरता परवाना देण्यात येईल.

# अवघ्या तीन तासाच्या आत खुनाचा गुन्हा उघडकीस

प्रतिनिधी १० एप्रिल



**अमरावती :** अमरावती शहर गुन्हे शाखेकडून खुनाचा गुन्हा तीन तासात उघडकीस आणण्यात पोलिसांना इशाली आहे.

दिनांक ९ एप्रिल रोजी नियंत्रन कक्ष येथे माहीती प्राप्त झाली कि पोलीस स्टेशन खोलापुरी गेट हददीमधील अकोली येथील क्रिकेट ग्राउडवर एका पुरुष जातीचे प्रेत पडले आहे. अशी माहीती प्राप्त झाल्याने अमरावती आयुक्तालयातील वरिष्ठ अधिकारी तसेच गुन्हे शाखेचे अधिकारी व अंमलदार यानी तात्काळ घटनास्थळी भेट दिली असता सदर मृतकाबाबत माहीती घेतली असता त्याचे नाव किरण कमलाकर पुणतांबेकर वय ४६ वर्ष रा. सप्तश्री अपार्टमेन्ट, अकोली रोड अमरावती असे असल्याचे माहीती झाले. गुन्हे शाखेचे अधिकारी व अमलदार यानी तात्काळ घटनास्थळी भेट देवुन तसेच मृतकाची पत्नी व इतर नातेवाईकाकडे सखोल चौकशी केलीम मृतक याचे सोबत अकोली गावात राहणारे आकाश धुर्वे, स्वप्नील चतुर असे मृतक सोबत होते अशा माहीती वरून लागलीच गुन्हे शाखेचे पथक आरोपीतांचे राहते घरी व त्याचे संभाव्य ठिकणी शोध घेतला असता ते मिळुन आले नाही त्यामुळे गुन्हे शाखेचे चार पथक तयार करून सर्वत्र त्यांचा शोध घेतला असता आरोपी हे बडनेरा रेल्वे स्टेशन येथुन रेल्वेने पसार होण्याच्या तयारीत असतांना त्यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांना त्याचे पुर्ण नाव पत्ता विचारले ते खालील प्रमाणे.

ताब्यात घेतलेल्या आरोपीचे नाव: आकाश अंतराम धुवे वय २४ वर्ष रा. ग्राम चांदुरी ता. भातकुली जि. अमरावती ह.मु. ग्राम अकोली ठाकरे यांच्या घरी भाडयाने, अमरावती. ,स्वप्निल साहेबराव चतुर वय २१ वर्ष रा. ग्राम अकोली मनपा शाळे मागे, अमरावती.

प्राथमीक तपास केला असता आरोपीतांनी सांगीतले कि मृतक व आरोपी हे एकमेकांना बरेच दिवसापासून ओळखत असुन आज रोजी दारू पिण्याच्या कारणावरून त्यांच्यात वादविवाद झाल्याने आरोपीतांनी मृतकास अकोली येथील क्रिकेट ग्राउंडवर मारहान केली त्यात त्याचा मृत्यु झाला. आरोपीतांनी सदरचा गुन्हा केल्याचे कबुल केले असुन सदर घटनेबाबत पोलीस स्टेशन खोलापुरी गेट येथे गुन्हा नोंद करण्याची कायदेशीर प्रक्रीया सुरू आहे.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत तिवसा हायवेवर बिबट्याचा मृत्यू

प्रतिनिधी १० एप्रिल



**अमरावती :** तिवसा तालुक्यातील राष्ट्रीय महामार्गावर अज्ञात वाहनाच्या धडकेत एका बिबट्याचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. गुरुवारी सकाळी ६ ते ७ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली असून, या अपघातामुळे वन्यजीव सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिल्यामुळे बिबट्या रस्त्याच्या कडेला फेकला गेला. त्याच्या जबड्याला, कंबरेला आणि पायाला गंभीर दुखापत झाली होती. अपघातानंतर तब्बल दोन ते तीन तास तो जखमी अवस्थेत रस्त्याच्या कडेला तडफडत पडून होता.

दरम्यान, ही घटना स्थानिक नागरिकांच्या निदर्शनास आल्यानंतर वन विभागाला तातडीने कळविण्यात आले. वनपरिक्षेत्र अधिकारी अनिल चौधरी, रेस्क्यू टीमचे चंद्रकांत बंधर, अमोल गावंडे, मानद वन्यजीव संरक्षक डॉ. सावंत देशमुख व सहकारी कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी जखमी बिबट्याला प्राथमिक उपचार देत पुढील उपचारासाठी हलविण्याची तयारी केली.

यावेळी परिसरात मोठी गर्दी जमल्याने काही वेळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनीही घटनास्थळी धाव घेतली. गोपनीय गोपाल उपाध्याय यांच्या नेतृत्वात पोलिसांनी जमाव पांगवून परिस्थिती सुरळीत केली.

प्राणिमित्र अविनाश पांडे यांनीही या घटनेत महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांनी नागरिकांच्या मदतीने बिबट्याला शांत करण्यासाठी जाळी टाकून त्याला ताब्यात घेतले आणि वन विभागाशी समन्वय साधला.

यानंतर बिबट्याला पुढील उपचारासाठी नागपूर येथील गोरेवाडा प्रकल्पाकडे हलविण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान बिबट्याचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी माहिती समोर आली आहे.

या घटनेमुळे राष्ट्रीय महामार्गावरील वन्यजीवांच्या सुरक्षेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले असून, अशा घटना टाळण्यासाठी तातडीने ठोस उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# नागरिकांसाठी पाणपोईचे उद्घाटन




प्रतिनिधी १० एप्रिल

**अमरावती :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या (आरएसएस) १०० व्या वर्धापन दिनानिमित्त, सेवा, त्याग, समर्पण आणि देशभक्तीच्या भावनेने प्रेरित एका सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. लप्पीभैया म्हणून ओळखले जाणारे चंद्रकुमार जाजोदिया यांच्या मार्गदर्शनाखाली, भगवान शिवाच्या विधीवत पूजेनंतर 'पाणी पूई' (थंड पाणी वाटप) सेवेचा शुभारंभ करण्यात आला.

हा कार्यक्रम अमरावतीतील खत्री कंपाऊंडजवळील मालवीय चौकात आयोजित करण्यात आला होता. जिथे कडक उन्हाच्या पार्श्वभूमीवर सर्वसामान्यांना थंड पाणी पुरवण्यात आले. येणाऱ्या-जाणाऱ्यांना आणि गरजूंना दिलासा देणे हा या सेवेचा उद्देश होता.

सीमाताई गुरदे आणि राजन आदतिया हे या प्रकल्पाचे अध्यक्ष होते. या कार्यक्रमात माधुरी कडसरपे, ब्रह्मदत्त शर्मा, विनोद पोसरकर, कमल रावत, किशोरभाई सेटा, गुणवाटा भाऊ, संजू भाऊ गुहे, विजू खंडेलवाल, गोपाल सारडा, वंदना बोबडे, संध्या वेवारे, उत्कर्ष लांडे, रोशन गुप्ता आणि गौरव लुनावत यांच्यासह अनेक मान्यवर विशेषतः उपस्थित होते. आयोजकांनी माहिती दिली की, ही सेवा येत्या काळातही सुरू राहील, जेणेकरून अधिकाधिक लोकांना या उपक्रमाचा लाभ घेता येईल.

# महिला बाल कल्याण समिती सभापती ममता आवारे यांचा पदग्रहण समारंभ

प्रतिनिधी १० एप्रिल

**अमरावती :** महिला व बाल कल्याण समितीच्या सभापतीपदी सौ. ममता संदिप आवारे यांच्या पदग्रहण समारंभाचा आज अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात भव्य सोहळा पार पडला. महापालिकेच्या स्व.सुदामकाका देशमुख सभागृहात आयोजित करण्यात आला. या समारंभाला प्रामुख्याने उपस्थित अमरावतीच्या आमदार सौ.सुलभाताई संजय खोडके यांच्या हस्ते सभापती ममता आवारे यांचा सत्कार करुन शुभेच्छा देण्यात आल्या. या कार्यक्रमाला विविध मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, महिला बचत गटांच्या प्रतिनिधींसह मोठ्या संख्येने नागरिकांची उपस्थिती लाभली होती.

## आमदार सुलभा खोडके यांची उपस्थिती



याप्रसंगी आमदार सौ.सुलभाताई संजय खोडके म्हणाल्या की, आज महिला व बाल कल्याण समितीच्या सभापतीपदी ममता आवारे यांच्या पदग्रहण समारंभाच्या निमित्ताने उपस्थित राहण्याची संधी मिळाल्याबद्दल मनस्वी आनंद होत आहे. ममता आवारे या सामाजिक कार्यात नेहमीच पुढाकार घेणाऱ्या आणि तळागाळातील घटकांसाठी काम करणाऱ्या कार्यकर्त्या आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली महिला व बाल कल्याण समिती निश्चितच अधिक सक्षम, कार्यक्षम आणि जनतेच्या अपेक्षांना न्याय देणारी ठरेल, असा विश्वास आमदार सौ.सुलभाताई खोडके यांनी व्यक्त केला. पुढे बोलतांना त्या म्हणाल्या की, महिला सक्षमीकरण ही केवळ संकल्पना नसून ती प्रत्यक्षात उतरविण्याची गरज आहे. महिलांना शिक्षण, रोजगार, स्वावलंबन आणि सुरक्षितता या सर्व बाबींमध्ये सक्षम करणे आवश्यक आहे. महापालिकेच्या बजटमध्ये महिला बाल विकास विभागासाठी ५ टक्के निधीची तरतुद करण्यात आल्याने त्यांचे आरोग्य, पोषण, प्रशिक्षण, व्यवसाय व उद्योग अश्या विविध योजनांवर सुयोग्य नियोजन करुन महिला सक्षमीकरणाचे ध्येय साधण्यासाठी प्रयत्न करूया, अशी अपेक्षा आमदार .सुलभा खोडके यांनी व्यक्त केली. यावेळी महापौर श्रीचंद तेजवाणी व स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर यांनी आपल्या संबोधनातून सभापती ममता आवारे यांना शुभेच्छा दिल्या. महापालिकेत विविध समित्यांवर महिला सदस्यांना काम करण्याची संधी मिळाल्याने महापालिकेत महिला राज नांदत असल्याचे गौरोद्गार त्यांनी व्यक्त केले.

तसेच बालकांच्या शिक्षण, आरोग्य आणि पोषण यावर विशेष भर देत विविध उपक्रम राबविण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. यावेळी अमरावती विधानसभा मतदार संघाच्या आमदार सौ.सुलभाताई खोडके यांच्या समवेत महापौर श्रीचंद तेजवाणी, उपमहापौर सचिन भेंडे, स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, पक्षनेते चेतन गावंडे, शहर सुधार समिती सभापती सौ.राधा राजु कुरील, विधी समिती उपसभापती सौ.मधुरा मिलींद कहाळे, महिला बाल कल्याण समिती उपसभापती सौ.लता देशमुख, नगरसेवक मंगेश मनोहरे, मनिष बजाज, चंद्रकांत उर्फ चंदु खेडकर, गुड्डु उर्फ प्रशांत धर्माळे, प्रमोद महल्ले, भोजराज काळे, ॲड. प्रशांत देशपांडे, नगरसेविका सौ.मिनल योगेश सवाई, सौ.अर्चना मनिष पाटील, सौ. विद्या शिवदत्त माटे, डॉ.अर्चना संजय आत्राम, माजी महापौर ॲड.किशोर शेळके, कवीता गायकवाडे, जयश्री आवारे आदीसह महिला मंडळ, पदाधिकारी व सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वीज यंत्रणेजवळ कचरा जाळण्याचा धोका: प्रसंगावधानाने मोठी दुर्घटना टळली

प्रतिनिधी १० एप्रिल



**अमरावती:** शहरातील उस्मानिया मशिदीजवळ महावितरणच्या रोहित्राजवळ टाकलेल्या कचऱ्याला आग लागल्याची घटना घडली. ही आग अपघाती लागली की लावण्यात आली, याबाबत स्पष्टता नसली तरी प्रसंगावधानामुळे मोठी हानी टळली. महावितरण आणि अग्निशमन कर्मचाऱ्यांच्या तत्परतेमुळे आगीवर लवकर नियंत्रण मिळविण्यात यश आले.

मात्र या घटनेत महावितरणच्या वीज यंत्रणेला नुकसान झाले असून परिसरातील वीजपुरवठा काही काळ खंडित झाला होता. महावितरणचे सहाय्यक अभियंता विनायक वाडवे, वरिष्ठ तंत्रज्ञ अनुप धर्माळे, नारायण वाघ यांनी पर्यायी व्यवस्थेला गती देत वीजपुरवठा पुन्हा सुरळीत केला.

वीज वाहिन्या, वितरण रोहित्र, फीडर पिलर किंवा वितरण पेट्यांजवळ कचरा जाळल्यामुळे वीज यंत्रणेला गंभीर धोका निर्माण होतो. यामुळे केवळ यंत्रणेचे नुकसान होत नाही, तर नागरिकांनाही मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो, असे कार्यकारी अभियंता राजेश घाटोळे यांनी सांगितले. शहरी आणि ग्रामीण भागात अनेक ठिकाणी वीज यंत्रणेजवळ कचरा टाकण्याचे प्रकार वाढत आहेत. हा कचरा जळल्यास भूमिगत केबल्स तसेच इतर उपकरणांचे नुकसान होऊन वीजपुरवठा खंडित होण्याच्या घटना वारंवार घडत आहेत. वाढत्या उन्हामुळे अशा आगींचा धोका अधिक वाढला आहे.

तसेच, उपरी वीजवाहिन्यांखाली कचऱ्याला आग लागल्यास तारा वितळण्याची शक्यता असून मोठी दुर्घटना घडू शकते. त्यामुळे नागरिकांनी वीज यंत्रणेजवळ कचरा टाकू नये किंवा जाळू नये, असे आवाहन महावितरणने केले आहे. वीज यंत्रणेला आग लागल्याची घटना आढळल्यास तत्काळ ७८७५७६३८७३ या क्रमांकावर, तसेच १८००-२१२-३४३५ किंवा १८००-२३३-३४३५ या टोल-फ्री क्रमांकांवर किंवा जवळच्या महावितरण कार्यालयाला माहिती द्यावी, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# काँग्रेस शिष्टमंडळाची नवनियुक्त मनपा आयुक्त वर्षा लड्ढा यांची सदिच्छा भेट

प्रतिनिधी १० एप्रिल



**अमरावती:** अमरावती महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते विलास इंगोले, अमरावती शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष बबलू शेखावत, माजी महापौर मिलिंद चिमोटे, स्वीकृत नगरसेवक अनिल अग्रवाल, समाजसेवक फिरोज खान, नगरसेवक संजय शिरभाते आणि नगरसेवक प्रशांत महल्ले,नगरसेवक विक्की उर्फ विशाल वानखडे यांनी आज नवनियुक्त महानगरपालिका आयुक्त श्रीमती वर्षा लड्ढा यांची सदिच्छा भेट घेतली आणि त्यांचे स्वागत केले.या भेटीदरम्यान काँग्रेस नेत्यांनी शहरातील नागरिकांच्या मूलभूत आणि महत्त्वाच्या समस्या आयुक्तांच्या निदर्शनास आणल्या. यामध्ये मुख्यतः कचऱ्याच्या अव्यवस्थेचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. शहरात कचऱ्याची प्रचंड समस्या निर्माण झाली असून, त्यामुळे संपूर्ण शहर अस्ताव्यस्त झाले आहे. नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण झाला असून, रोगराई पसरण्याची भीती व्यक्त करण्यात आली.शिष्टमंडळाने स्वच्छता समितीच्या कामकाजाबाबतही चर्चा केली. स्वच्छतेच्या टेंडर प्रक्रिया, करारनामा (ॲग्रीमेंट) आणि प्रत्यक्ष कामकाजात मोठ्या अनियमितता असल्याचे निदर्शनास आणले. महानगरपालिकेच्या प्रशासनाने टेंडर अटी-शर्तींचे पालन केले नसल्याने शहरात स्वच्छतेच्या कामात हाहाकार उडाला असल्याचे सांगितले. याबाबत तातडीने आणि प्रभावी कारवाई करण्याची विनंती आयुक्तांना करण्यात आली.तसेच, महानगरपालिकेने काढलेल्या १३ कोटी रुपयांच्या बायोमायनिंग टेंडरबाबतही गंभीर आक्षेप नोंदवण्यात आले.संबंधित कंत्राटदाराकडे पुरेसा अनुभव नसल्याचे, प्रकल्प अहवाल नसल्याचे आणि भोपाळ येथे त्यांचा करार रद्द करण्यात आल्याची माहिती असताना,तत्कालीन आयुक्तांनी कार्यारंभ आदेश स्थगित केला होता.पर्यावरण तज्ज्ञ, काँग्रेस पक्ष आणि स्थायी समितीने यावर आक्षेप घेतले होते.तरीही ३ दिवसांपूर्वी बदलीपूर्वी घाईघाईने जाण्याआधी आयुक्त महोदयांनी हा आदेश देण्यात आल्याचे निदर्शनास नवीन आयुक्तांच्या आणून देण्यात आले.

शिष्टमंडळाने असे स्पष्ट केले की, नियमबाह्य पद्धतीने आणि गैरप्रकाराने दिलेला हा कार्यारंभ आदेश चुकीचा असून, याची तातडीने समीक्षा करावी.आयुक्त श्रीमती वर्षा लाद्ढा यांनी या सर्व मुद्द्यांवर लक्ष घालण्याचे आश्वासन दिले.याप्रसंगी आयुक्त यांनी शहराला विकासाच्या दिशेने नेण्यासंदर्भात सर्वांनी सहकार्य करावे अशी अपेक्षा व्यक्त केली.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त पोलिसांची बैठक

प्रतिनिधी १० एप्रिल



**अमरावती :** १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मोठ्या प्रमाणात साजरी करण्यात येणार आहे.

सदर उत्सवा दरम्यान कोणताही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये या करीता आज दि. ०८/०४/२०२६ रोजी पोलीस आयुक्त राकेश ओला यांचे अध्यक्षतेखाली पोलीस आयुक्त कार्यालय येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीचे पदाधिकारी, आयोजन समिती, स्थानिक उत्सवाचे प्रमुख, प्रतिष्ठीत नागरीक, पोलीस आयुक्त स्तरावरील शांतता समिती सदस्य, महानगरपालिका, विद्युत विभागाचे प्रशासकीय प्रमुख, अन्न व औषधी प्रशासन, अग्नीशमन विभाग तसेच सर्व पोलीस अधिकारी यांची बैठक घेण्यात आली.

बैठकीमध्ये उपस्थित सदस्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव आनंदात साजरा होण्यासाठी काही मुददे उपस्थित केले त्यावर मा. पोलीस आयुक्त अमरावती शहर यांनी अमरावती शहर हे अत्यंत शांतता प्रिय असून येथील हिंदु व मुस्लीम नागरीकांनी शहरातील शांतता अबाधीत ठेवण्याकरीता नेहमीच सहकार्य केलेले आहे. त्यामुळे यापुढे हि अमरावती शहर वासियांकडून अशाच सहकार्याची अपेक्षा आहे. त्यांनी आपसामध्ये भाईचारा ठेवून शहरात कोणताही अनुचित प्रकार होणार नाही. यादुष्टीकोनातुन एकजुट राहून शहरात शांतता कायम ठेवावी. याकरीता हि बैठक घेण्यात आली. बैठकीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सवा दरम्यान शोभायात्रेमध्ये कोणतेही शस्त्र अथवा ज्वलनशील पदार्थ सोबत बाळगणार नाही याबाबत सुचीत करण्यात आले. शहरातील डॉ. बाबासाहेव आंबेडकर यांचे पुतळे, स्मारक व चित्रा चौक येथील महात्मा फुले यांचा पुतळा साफसफाई करण्यात यावी याबाबत महानगरपालिका अधिकारी यांना निर्देश देण्यात आले. तसेच उत्सव काळात शहरातील पाणी पुरवठा विज पुरवठा खंडीत होणार नाही याबाबत विज वितरण विभागास सुचीत करण्यात आले आहे. त्यांनी सर्व उपस्थीतांना कोणत्याही अफवेवर विश्वास ठेवू नये, सोशल मिडीयावर प्रकाशित होणारे माहितीबाबत खात्री करावी त्याची माहिती पोलीसांना दयावी. समाजात तेढ निर्माण करणारे पोस्ट व्हायरल करणा-यांची माहिती घेवून पोलीसांना कळवावे. सोशल मिडीयावर प्रकाशीत होणारे पोस्ट करणा-या व्यक्तींवर सायबर पोलीस तर्फे करडी नजर राहील. सोशल मिडीयाव्दारे पसरणा-या अफवांवर विश्वास ठेवु नये. पोलीस विभागाकडून शहरातील शांतता भंग करणारे समाजकंटकांची माहिती संकलीत करण्यात आलेली असून त्यांच्यावर कठोर करवाई करण्यात येणार आहे.

# अंजनगावसुर्जीच्या महिला होणार आत्मनिर्भर

प्रतिनिधी १० एप्रिल

## जिल्हाधिकाऱ्यांनी साधला प्रशिक्षणार्थ्यांशी थेट संवाद

**अमरावती:** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अमरावती मार्फत आणि जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून राबविण्यात येणाऱ्या किमान कौशल्य विकास कार्यक्रम (२०२५-२६)अंतर्गत सुरू असलेल्या 'फॅशन डिझायनर' या अभ्यासक्रमाच्या प्रशिक्षण बॅचला आज जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी भेट दिली. अंजनगाव सुर्जी येथील रोशनी महिला विकास संस्थेद्वारे संचलित या प्रशिक्षणार्थीसोबत त्यांनी थेट संवाद साधला आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. प्रशिक्षणातून स्वावलंबी होण्याचा मार्ग प्राप्त होतो असेही मत त्यांनी यावेळी व्यक्त केलेत.



या भेटीदरम्यान जिल्हाधिकारी येरेकर म्हणाले की, ठया योजनेचा उद्देश केवळ प्रशिक्षण पूर्ण करणे हा उद्देश नसून, प्राप्त कौशल्याचा वापर करून आर्थिकदृष्ट्या सक्षम होणे महत्त्वाचे आहे. रोशनी रेडीमेड गारमेंट फाउंडेशन, एमआयडीसी, अंजनगाव सुर्जी येथे कार्यान्वित करण्यात आलेल्या फेब्रिक क्लस्टरमध्ये प्रशिक्षणार्थ्यांनी रोजगाराच्या संधी मिळवाव्यात आणि स्वतःच्या पायावर उभे होवून सक्षम व्हावे, असा मानस त्यांनी यावेळी व्यक्त केला. महिलांनी केवळ वस्तूंची निर्मिती करून न थांबता, त्यांच्या मार्केटिंगवर विशेष लक्ष केंद्रित करावे. व्यवसायाचे विस्तारीकरण करण्यासाठी बाजारपेठेची मागणी ओळखून नाविन्यपूर्ण प्रयत्न करणे आवश्यक आहे. प्रशिक्षणार्थींनी केवळ प्रशिक्षणापुरते मर्यादित न राहता, उद्योग उभारणीसाठी पुढाकार घ्यावा. विविध शासकीय योजनांतर्गत उपलब्ध असलेल्या निधीचा आणि सवलतीच्या कर्ज योजनांचा लाभ घेऊन स्वतःचे छोटे-मोठे उद्योग सुरू करावेत व आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व्हावे, जिल्हाधिकारी श्री. येरेकर म्हणाले. या विशेष प्रशिक्षण उपक्रमात अल्पसंख्यांक समाजातील महिलांनी नोंदवलेला उत्स्फूर्त प्रतिसाद पाहून जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी समाधान व्यक्त केले. समाजातील सर्व स्तरांतील महिला मुख्य प्रवाहात येत असल्याबद्दल त्यांनी कौतुक केले. हा प्रशिक्षण कार्यक्रम जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून पूर्णतः मोफत राबविला जात आहे. जिल्हा उद्योग केंद्र,अमरावती यांचे निधीतून उभे राहिलेल्या स्थानिक एमआयडीसीमधील फेब्रिक क्लस्टरमध्ये किमान कौशल्य विकास कार्यक्रम अंतर्गत प्रशिक्षण पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थ्यांना रोजगारासाठी प्राधान्य देण्यात येणार आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

शुक्रवार दि १० एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## एसआयआर मोहीम यशस्वी करावी - जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर



**वाशीम:** छायाचित्र मतदार याद्यांच्या सखोल पुनरिक्षण (एसआयआर) मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करत पूर्वतयारी पूर्ण ठेवणे अत्यावश्यक आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले. निवडणूक आयोगाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या एसआयआर कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. जिल्हाधिकारी कुंभेजकर यांनी प्रत्येक मतदान केंद्रावर मतदान स्तर प्रतिनिधी (बीएलए) नियुक्ती करण्यासह मतदार नोंद मॅपिंगसाठी व्यापक जनजागृती करण्याच्या सूचना दिल्या. बूथस्तर अधिकारी (बीएलओ) यांना आवश्यक ते सहकार्य करणे, कायमस्वरूपी स्थलांतरित व मयत मतदारांची माहिती अद्ययावत करणे, मतदार यादीतील अस्पष्ट छायाचित्रांबाबत माहिती देणे तसेच १८ वर्ष पूर्ण झालेल्या नवमतदारांची नोंदणी करण्यावर भर देण्याचे निर्देश त्यांनी दिले. एसआयआर कालावधीत बीएलए मार्फत दररोज १० अर्ज तसेच एकूण ५० अर्ज सादर करता येणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.

# निलंबित पीएसआय गिरी यांच्या कारवाया फेक...

# कामे नाही केली नेक, सर्व प्रकरणे करा चेक!

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वाशीम शहरातील पोस्ट ऑफिस चौकामध्ये दोन महिने आधी दोन गटात आपसीवाद वाद झालं होता. यामध्ये आरोपींना त्रस्त करण्यासाठी वाशीम शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलं होतं. दाखल झालेल्या खोट्या तक्रारीनंतर तपास अधिकारी निलंबित पीएसआय सुनील गिरी यांच्या कार्यप्रणालीने वाशीम पोलीस दलाची प्रतिमा मलीन करण्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणात तपास अधिकाऱ्याने फिर्यादी कडुन लाखो रुपयांचा मलिदा लाटून स्वतःचे 'खलनायकी' रूप जनतेसमोर आणले आहे. हे प्रकरण आता राज्याच्या गृहमंत्र्यापर्यंत पोहोचल्याने वादग्रस्त पीएसआय सुनील गिरी यांना जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अनुज तारे यांनी तात्काळ निलंबित केले आहे.



### *अनेक तपास केले सेट
### *एसपीची कारवाई ग्रेट
### *बडतर्फ होणार का थेट



देपुळ ता. जि.वाशीम येथील डॉ. प्रमोद गंगावणे आणि मालेगाव तालुक्यातील मैराळडोह येथील शुभम घुगे यांच्या देवान घेवाणीच्या रक्कमेतुन ०३/०२/२०२६ रोजी आपसी वाद झाले. या वादाचे प्रकरण डॉ. गंगावणे यांचे अंगलट येवू नये म्हणून फिर्यादी डॉ. गंगावणे यांनी वाशीम शहर पोलीस ठाण्यातील पीएसआय गिरी यांना खुश करून मालामाल केल्याचीही पोलीस विभागात चर्चा आहे. या नाट्यमय प्रकरणात फिर्यादीच्या सांगण्यावरून शुभम घुगे, ज्ञानेश्वर घुगे, पवन घाटोळ आणि अज्ञात चार जणांविरुद्ध वाशीम शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. याप्रकरणी गुन्हा नोंद झाला तेव्हा कर्तव्यावर पीएसआय नाईकवाडे उपस्थित होते. परंतु या प्रकरणाचा तपास वादग्रस्त पीएसआय सुनील गिरी यांनी स्वतःकडे घेऊन फिर्यादी कडुन मलिदा लाटल्याची चर्चा सुद्धा पोलीस विभागात चर्चिल्या जात आहे. वादग्रस्त निलंबित पीएसआयने स्वतःच्या आर्थिक लाभासाठी या प्रकरणातील आरोपींना व आरोपीच्या मित्रांना मोठ्या प्रमाणात मानसिक त्रास देऊन मोठे घबाड केल्याचा आरोपही आरोपीच्या परिवारासह मित्र मंडळीकडून केला जात आहे. या प्रकरणावरून पीएसआय सुनील गिरी यांचे 'खलनायकी' रूप जनतेसमोर आले आहे.

पीएसआय सुनील गिरी वाशीम शहर पोलीस ठाण्यात रुजू झालेत तेव्हापासून त्यांच्यावर निलंबनाची कारवाई होईपर्यंत त्यांच्याकडे ज्या- ज्या प्रकरणाचा तपास होता. त्या- त्या सर्व प्रकरणाची वरिष्ठ अधिकाऱ्यामार्फत चौकशी करण्याची गरज असल्याचीही जनतेमध्ये चर्चा आहे. निलंबित पीएसआय गिरी यांच्या खाबूगिरीने वाशीममध्ये खाकीची प्रतिमा मलिन झाली असून निरपराध लोकांवर त्यांनी केलेल्या अत्याचाराची सुद्धा वरिष्ठांनी तातडीने सखोल चौकशी करण्यासाठी पुढाकार घेण्याची गरज आहे. मात्र आता तरी गिरी यांच्याकडील सर्व प्रकरणाची चौकशी केली जाणार का ? चौकशी करून त्यांना सेवेतून बडतर्फ केले जाणार का ? याकडे संपूर्ण जिल्हा वासियांचे लक्ष लागले आहे.

### गिरी यांचे इंस्टाग्राम रील आणि स्टेटस चर्चेत !

पीएसआय सुनील गिरी यांची इंस्टाग्रामवरील एक रील सध्या चांगलीच चर्चेत आली आहे. या रीलमध्ये गिरी वर्दीत बंदोबस्ताच्या ठिकाणी दिसत असून त्यावर 'मै यहाँ किसी के फटे में टांग अड़ाने नहीं आया, राज करने आया हूँष्ठ झुकेगा नहीं साला' हा पुष्पा चित्रपटातील डायलॉग वापरण्यात आला आहे. याशिवाय, निलंबनानंतर गिरी यांनी व्हॉट्सअँप स्टेटसवर 'शेर जख्मी हो जाने से, जंगल भेड़ियों का नहीं हो जाता' असे लिहिल्यानेही चर्चा रंगली आहे. या पोस्टमुळे गिरी स्वतःला 'शेर' समजत आहेत का, की इतरांना 'भेड़िये' म्हणत आहेत, याबाबत अनेक तर्कवितर्क लावले जात आहेत. दरम्यान, निलंबनानंतर अशा प्रकारचे रील आणि स्टेटस टाकल्याने त्यांच्या कृत्याबाबत त्यांना पश्चाताप नसल्याची भावना व्यक्त होत आहे.




## थोडक्यात

### वैरणीला आग लागून हजारोचे नुकसान



● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वांगी येथे काल दुपारी सुमारे ४ वाजताच्या सुमारास शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या आगीत एका शेतकऱ्याची वैरण जळून खाक झाली. या आगीत मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून अंदाजे ४० हजार रुपयांचे नुकसान झाल्याची माहिती समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, या आगीत तुरीचे कुटार चार टाळी, हरभरा कुटार एक टाळी, कडबा सुमारे १०० पेढ्या, सहा पाईप तसेच एक ताडपत्री जळून पूर्णपणे नष्ट झाले. अचानक लागलेल्या आगीमुळे शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. सदर घटना शॉर्टसर्किटमुळे घडल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. या प्रकरणी उद्या अधिकृत तक्रार दाखल करण्यात येणार असल्याची माहिती भागवत भोयर (मा. पं. स. सदस्य, वाशिम) यांनी दिली. या घटनेमुळे शेतकऱ्यांमध्ये चिंता व्यक्त होत असून संबंधित विभागाने तातडीने पंचनामा करून नुकसानभरपाई देण्याची मागणी होत आहे.

### हळदीला १५ हजारांवर भाव; आवकने उच्चांक गाठला

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

रिसोड येथील कृषी उत्पन्न बाजार समितीत ९ एप्रिल रोजी हळदीच्या दराने उच्चांक गाठत १५ हजार रुपयांपेक्षा अधिक भाव मिळाल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले. नव्या हंगामातील हळदीची मोठ्या प्रमाणात आवक झाल्याने बाजार समिती परिसर सकाळपासूनच गजबजलेला होता.



रिसोड तालुक्यात यंदा हळदीचे क्षेत्र सर्वाधिक होते. नवीन हळद विक्रीसाठी बाजार समितीत येत आहे. ९ एप्रिल रोजी रिसोड बाजार समितीत प्रथमच मोठ्या प्रमाणात हळदीची आवक झाली. सुमारे ९ हजार क्विंटल हळद बाजारात दाखल झाल्याने दराबाबत शेतकऱ्यांमध्ये सुरुवातीला संभ्रमाचे वातावरण होते. मात्र, प्रत्यक्ष लिलावात व्यापाऱ्यांकडून चांगली बोली लागत १३ हजार ते १५ हजार २५० रुपयांपर्यंत भाव मिळाल्याने शेतकऱ्यांचा विश्वास वाढला. बाजार समितीचे सभापती विष्णुपंत भुतेकर यांनी सकाळी ६ वाजतापासूनच बाजार समितीत उपस्थित राहून शेतकऱ्यांची गैरसोय होऊ नये यासाठी आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून दिल्या. त्यामुळे कोणत्याही शेतकऱ्याला आपला माल परत नेण्याची वेळ आली नाही. गुरूवारी मोठ्या प्रमाणात हळदीची आवक झाल्यामुळे लिलाव व मोजणीचे काम दोन दिवस चालणार आहे.

शेतकऱ्यांची कुठलीही गैरसोय होऊ नये यासाठी आम्ही योग्य ती उपाययोजना केली आहे. हळद हे मुख्य पीक असल्याने शेतकऱ्यांना जास्तीत जास्त दर मिळवून देण्यासाठी प्रयत्न सुरू राहतील.

**- विष्णुपंत भुतेकर**
**सभापती, बाजार समिती, रिसोड**

बाजार समितीत ९ एप्रिल रोजी साधारणतः ९ हजार क्विंटल हळदची आवक होती. त्यामुळे आज आणि उद्या हळदीचा लिलाव आणि मोजणी होणार आहे.

**- विजय देशमुख**
**सचिव, बाजार समिती, रिसोड**

## आजपासून क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले जयंती महोत्सव !

### * विविध कार्यक्रमांचे आयोजन *भव्य मोटार सायकल सद्भावना रॅलीचे आयोजन * सहभागी होण्याचे आवाहन

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

सामाजिक क्रांतीचे अग्रदूत क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या १९९ व्या जयंतीनिमित्त तसेच द्विशताब्दी जयंती वर्षोत्सवानिमित्त वाशिम शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने या उत्सवाचे आयोजन करण्यात आले असून, यामध्ये सामाजिक एकता, बंधुभाव आणि प्रबोधनाचा संदेश देणारे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

या उत्सवानिमित्त शनिवार, दि. ११ एप्रिल रोजी सकाळी ८.३० वाजता भव्य मोटरसायकल सद्भावना रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. ही रॅली क्रांतिसूर्य महात्मा फुले व सावित्रीबाई फुले स्मारक परिसरातून प्रारंभ होऊन शहरातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करत फुले स्मारक येथेच रॅलीचा समारोप होणार आहे. तसेच सायंकाळी ६ वाजता प्रबोधनात्मक जाहीर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले असून, ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. अशोक राणा यवतमाळ हे 'क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले यांचे समाजकार्य आणि आजची सामाजिक स्थिती ' या विषयावर सखोल मार्गदर्शन करणार आहेत. या व्याख्यानातून समाजातील



विविध घटकांना प्रेरणा मिळणार असून, युवकांना दिशा देणारे विचार मांडले जाणार आहेत. या जयंती उत्सवाच्या पूर्वसंध्येला शुक्रवार, दि. १० एप्रिल रोजी दुपारी ३.३० वाजता भव्य रंगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत महिला, युवक-युवती तसेच विद्यार्थ्यांची नोंदणी झाली असून, सामाजिक विषयांवर आधारित कलाकृतींमधून समाजप्रबोधनाचा संदेश देण्यात येणार आहे. तसेच सायंकाळी ६ वाजता प्रबोधनपर भव्य किर्तनाचा कार्यक्रम होत आहे. सत्यपाल महाराज यांचे शिष्य असलेले सप्तखंजेरी वादक युवा प्रबोधनकार पंकजपाल महाराज हे किर्तनातून समतेचा संदेश देणार आहेत.


उत्सवातील सर्व कार्यक्रम क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्मारक परिसर, वाशिम येथे पार पडणार आहेत. या माध्यमातून फुले यांच्या विचारांचा प्रसार करत समाजात समता, बंधुभाव आणि शिक्षणाची जाणीव अधिक दृढ करण्याचा संकल्प आयोजकांनी व्यक्त केला आहे. समाजातील सर्व नागरिक, युवक, महिला तसेच विद्यार्थी बांधवांनी या जयंती उत्सवात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## रोजगार हमीच्या कामाची यादी ग्रामपंचायतमध्ये लावण्यात यावी !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

महाराष्ट्र राज्य शासनाच्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून होत असलेल्या कामाची यादी व रोजगार हमी योजनेच्या जॉब कार्ड असलेल्या लाभार्थ्यांची यादी ग्रामपंचायत मध्ये लावण्यात यावी. अशी मागणी ग्रामस्थांमधून करण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासन निर्णयानुसार महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून विविध प्रकारच्या योजना राबविण्यात येत असून त्या कागदपत्री राबविण्यात येतात तर काही वशीलेबाजीत येत असून रोजगार हमी आधी आम्ही अन्न, आधी तुम्ही असा अनुभव



ग्रामीण भागातील ग्रामस्थांना येत आहे. रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून शेततळे, गुरांचा गोठा, शाळेचे वॉल कंपाऊंड, कुशल अकुशल, कामगारांचे वेतन, शबरी, रमाई, प्रधानमंत्री आवास योजना, लाभार्थ्यांना दिली जाणारी मजुरी, वृक्षरोपण सह विविध प्रकारच्या अनेक योजना राबविल्या जातात. असून त्या प्रत्यक्ष लाभाच्या पर्यंत पोहोचत नसल्याची खंत ग्रामीण भागातील नागरिकाकडून होत आहे.

## एमआयडीसीच्या विकासासाठी...
## ना. गडकरी यांच्या सोबत चर्चा !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री न्यूह ऊँर्ब यांच्या नागपूर येथील निवासस्थानी आज वाशिम एमआयडीसीच्या सर्वांगीण विकासासंदर्भात अत्यंत महत्त्वपूर्ण आणि सकारात्मक बैठक पार पडली. या बैठकीमुळे वाशिमच्या औद्योगिक प्रगतीला नवे बळ मिळण्याची आशा व्यक्त केली जात आहे.

बैठकीदरम्यान वाशिम एमआयडीसीमधील पायाभूत सुविधांच्या विकासावर विशेष भर देत विविध प्रलंबित प्रश्नांवर सखोल चर्चा करण्यात आली. औद्योगिक क्षेत्रासाठी अत्यावश्यक असलेली पाणीपुरवठा व्यवस्था अधिक सक्षम करणे, अंतर्गत रस्त्यांचे मजबुतीकरण व



सुशोभीकरण, मोठ्या भूखंडांचे उपविभाजन करून लघु व मध्यम उद्योगांना प्रोत्साहन देणे तसेच अखंडित व दर्जेदार वीजपुरवठा सुनिश्चित करणे या महत्त्वाच्या विषयांवर मुद्देसूद विचारमंथन झाले. या बैठकीस औद्योगिक विकास संघटनेचे जिल्हाध्यक्ष विजयराव जाधव, उपाध्यक्ष डॉ. अंगत राऊत, संदीपजी धोटे, मुख्य सल्लागार अतुल भुतकर तसेच सचिव कृष्णा चौधरी उपस्थित होते. पदाधिकाऱ्यांनी वाशिम एमआयडीसीमधील विविध अडचणी प्रभावीपणे मांडत त्या सोडविण्याची मागणी केली.

## भ्रष्ट अधिकारी चतूर, भरारी पथकाची कारवाई थातूर - मातूर!

● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●

### मांडवा येथील पाझर तलाव प्रकरण

कारंजा तालुक्यातील मांडवा येथील काही शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या तक्रारीवर तहसीलदार व त्यांच्या टीमने मांडवा येथील पाझर तलाव येथे अचानक भेट दिली, त्यावेळी तेथे तीन शेतकऱ्यांच्या विद्युत तारेवर आकोडे टाकले असलेल्या पाझर तलावातून पाण्याचा अनधिकृत उपसा करतांना मोटरी पकडल्या व त्या मोटरी हर्षल रोकडे जलसंधारण अधिकारी कारंजा यांच्या ताब्यात दिल्या, परंतु जलसंधारण अधिकारी रोकडे यांनी तीन शेतकऱ्यांच्या नावाने तक्रार दाखल न करता फक्त एका शेतकऱ्याच्या नावाने तक्रार दाखल केली तर इतर दोन




मोटारींची तक्रार मूळ मालकाच्या नावाने न करता मजुराच्या नावाने दाखल केली. या प्रकरणांमध्ये पाझर तलावातून अनधिकृत पाण्याचा उपसा करणारे तिघे सख्खे भाऊ आहेत. तसेच या प्रकरणी तहसीलदार यांनी विद्युत वितरण कंपनीला अवैद्य विद्युत कनेक्शन बाबत पत्र देऊन सुद्धा विद्युत वितरण कंपनीने आज पर्यंत कोणती कारवाई केली नाही.

विद्युत तारेवर आकोडे टाकून पाझर तलावातील अनाधिकृत पाणी उपसा करणाऱ्या तीन शेतकऱ्यांना रंगे हात पकडल्यानंतर सुद्धा त्यातील एका शेतकऱ्याने आज रोजी तलावात वीस ते पंचवीस फूट गड्डा जेसीपी मशीन ने केला. याबाबत जलसंधारण अधिकारी राठोड यांना तक्रार देऊन तसेच त्यासंबंधी व्हिडिओ शूटिंग पाठवून सुद्धा त्यांनी आजपर्यंत कोणतीही कारवाई केली नाही. त्यामुळे मांडवा येथील पाझर तलावातून अवैद्य विद्युत कनेक्शन वापरून अवैद्य पाण्याचा उपसा करणाऱ्या वर भरारी पथकाने आजपर्यंत कोणतीही कारवाई केली नाही. त्यामुळे भरारी पथकातील कर्मचाऱ्यावर निलंबनाची कारवाई करावी अशी मागणी विष्णू रामदास पवार व जानराव नारायण भगत राहणार मांडवा यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच जिल्हाधिकारी वाशिम यांच्याकडे केली आहे.

## जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या उपाध्यक्षपदी राम ठाकरे !

### सहकार क्षेत्रात ठाकरे घराण्याचे निर्विवाद वर्चस्व कायम

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

राजकीयदृष्ट्या अत्यंत प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या अकोला- वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या उपाध्यक्षपदी रामेश्वर सुभाषराव ठाकरे यांची अविरोध निवड झाली असून यामुळे वाशिम जिल्ह्यातील सहकार क्षेत्रात आनंदाचे वातावरण पहावयास मिळाले आहे. तर माजी मंत्री तथा जिल्ह्यातील वजनदार नेते सुभाषराव ठाकरे यांचे सहकार क्षेत्रातील आपले निर्विवाद वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध झाले असून, मंगरूळपीर तालुक्याला पहिल्यांदाच हा बहुमान मिळाल्याचा आनंद व्यक्त होत आहे.

अकोला-वाशीम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अकोला येथील सभागृहात दिनांक ९ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत अध्यक्ष पदी डॉक्टर जयराज कोरपे तर उपाध्यक्षपदी रामेश्वर



सुभाषराव ठाकरे यांची एकमताने अविरोध निवड करण्यात आली आहे. नुकत्याच झालेल्या अकोला-वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत सहकार पॅनलचा घवघवीत विजय झाला होता. २१ संचालक संख्याबळ असलेल्या जिल्हा मध्यवर्ती बँकेत यामध्ये अकोला व वाशिम या दोन्ही जिल्ह्यातील संचालक मंडळांचा समावेश आहे. दिनांक ०९ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत सर्वानुमते डॉक्टर जयराज संतोष कोरपे यांची अध्यक्षपदी तर रामेश्वर सुभाषराव ठाकरे यांची उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.

रामेश्वर सुभाषराव ठाकरे हे जिल्ह्यातील वजनदार नेते सहकार महर्षी, माजी मंत्री सुभाषराव ठाकरे यांचे धाकटे चिरंजीव आहेत. सहकार नेते यशवंतराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनात माजी मंत्री सुभाषराव ठाकरे यांनी जुन्या मंगरूळपीर मतदारसंघात सहकार क्षेत्राची बाजू भक्कम करून शेतकरी शेतमजुरांना न्याय दिला, त्यांच्यापासून सुरू असलेला सहकाराचा वारसा रामेश्वर ठाकरे यांच्या निवडीने अधिक भक्कम केला आहे. माजी जिल्हा परिषद अध्यक्ष चंद्रकांत ठाकरे यांच्या मार्गदर्शनात आपण काम करणार असल्याचे मत रामेश्वर ठाकरे यांनी व्यक्त केले.




रामेश्वर ठाकरे हे माजी मंत्री सुभाषराव ठाकरे यांचे धाकटे चिरंजीव तर वाशिम जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष चंद्रकांत ठाकरे यांचे धाकटे बंधू आहेत. यशवंतराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सुभाषराव ठाकरे यांनी जिल्ह्यात सहकाराची जी मुहूर्तमेढ रोवली, तोच वारसा आता नव्या पिढीने अधिक भक्कम केला आहे.

## विदर्भाच्या क्रिकेटचा अभिमान फैज फजल यांची नवोदय विद्यालयात प्रेरणादायी भेट

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

विदर्भ क्रिकेटचा चेहरा, माजी कर्णधार आणि दमदार सलामीवी फैज फजल त्यांची जवाहर नवोदय विद्यालय, वाशिम येथे ११ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता प्रेरणादायी सदिच्छा भेट आयोजित करण्यात आली आहे.




विद्यार्थ्यांमध्ये खेळांविषयी आवड निर्माण व्हावी, त्यांना प्रोत्साहन मिळावे आणि त्यांच्या गुणवत्तेला योग्य दिशा मिळावी, या उद्देशाने हा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला असल्याची माहिती विद्यालयाचे प्राचार्य श्री. सचिन खरात यांनी दिली. फैज फजल हे विदर्भ क्रिकेटमधील एक भक्कम नाव असून त्यांनी रणजी क्रिकेटमध्ये तब्बल ७ हजार ६८३ धावा करत आपली वेगळी छाप निर्माण केली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली विदर्भ संघाने २०१७-१८ आणि २०१८-१९ या सलग हंगामांत रणजी ट्रॉफी जिंकत ऐतिहासिक यश संपादन केले. त्यांच्या कारकिर्दीतील हे सुवर्णक्षण आजही क्रिकेटप्रेमींना प्रेरणा देणारे आहेत. १७ डिसेंबर २००३ रोजी रणजी ट्रॉफीत पदार्पण करताना पहिल्याच सामन्यात १५१ धावा करत त्यांनी आपली क्षमता दाखवून दिली. २०१६ मध्ये भारतीय संघाकडून आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण करत त्यांनी हरारे येथे झिम्बाब्वेविरुद्ध पहिला एकदिवसीय सामना खेळला. विद्यार्थ्यांसाठी हा कार्यक्रम प्रेरणादायी ठरणार असून, खेळाडूंना थेट अनुभवी क्रिकेटपटूंकडून मार्गदर्शन मिळण्याची ही सुवर्णसंधी आहे. त्यामुळे वाशिम जिल्ह्यातील सर्व क्रिकेटप्रेमींनी व क्रीडाप्रेमी नागरिकांनी या कार्यक्रमास आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन विद्यालय प्रशासनाने केले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा

शुक्रवार, दि. १० एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## महावीर वस्तीत हिंदू संमेलन उत्साहात संपन्न

**खामगाव :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त सकल हिंदू समाजाच्या वतीने महावीर वस्तीत प्रेम लॉन येथे हिंदू संमेलन उत्साहात पार पडले. संमेलनाला प्रमुख वक्ते विदर्भ प्रांत सह व्यवस्था प्रमुख रुपेश शाह, चेतन महाराज (प्रमुख धर्माचार्य, शाक्त सखी परंपरा, अकोला), श्रद्धादीदी मोहन मिश्रा तसेच हिंदू संमेलनाचे अध्यक्ष भारत गणेश चौकसे व्यासपीठावर उपस्थित होते. सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते गोमाता, भारत माता आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून संमेलनाची सुरुवात करण्यात आली. या वेळी प्रमुख वक्ते रुपेश शाह यांनी आपल्या मार्गदर्शनात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त हिंदू समाज संघटित व्हावा तसेच सामाजिक समरसता, पर्यावरण संरक्षण, कुटुंब प्रबोधन, स्वावलंबी जीवनशैली आणि नागरिक कर्तव्ये या पंचपरिवर्तनांचा अंगीकार करण्याची गरज असल्याचे सांगितले.

# ऑनलाईन प्लॅटफॉर्म डिलिव्हरी क्षेत्रातील कामगारांची कसून पडताळणी

## कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांचे आदेश

प्रतिनिधी १० एप्रिल

***खामगाव :** ऑनलाइन प्लॅटफॉर्म, गिग आणि डिलिव्हरी वर्कर्समार्फत ग्राहकांना सुरक्षित सेवा पुरविली जावी, यासाठी या क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांची कसून पडताळणी करणे आवश्यक आहे. तसेच ग्राहकांना ही सेवा निर्दोष, सुरक्षित आणि कायद्याच्या चौकटीत मिळावी, याकरिता सर्वसमावेशक आराखडा तयार करण्याचे निर्देश कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी कामगार आणि गृह विभागाच्या मंत्रालयात आयोजित संयुक्त बैठकीत दिले.*

झोमॅटो, स्विगी, ब्लिंकिट आदी विविध डिलिव्हरी व सेवा देणाऱ्या कंपन्या ग्राहकांना घरपोच सेवा पुरवीण्यासाठी डिलिव्हरी पार्टनर्स नियुक्त करतात. सध्या या कंपन्या त्यांची ऑनलाईन, फेसलेस पद्धतीने नोंदणी करून नंतर ही माहिती थर्ड पार्टी व्हेरिफिकेशन एजन्सीकडे पाठवतात; मात्र या एजन्सींना पडताळणीचे अधिकार कोणी व कोणत्या निकषांवर दिले, त्यांच्या प्रक्रियेला कायदेशीर आधार काय, याबाबत मंत्री ॲड. फुंडकर यांच्या उपस्थितीत सविस्तर चर्चा करण्यात आली.

या बैठकीस आमदार सुमित वानखेडे, आमदार दादाराव केचे, माजी खासदार किरीट सोमय्या, कामगार विभागाच्या अपर मुख्य सचिव श्रीमती आय.ए. कुंदन, राज्य गुप्तवार्ता विभागाचे सह सचिव रवींद्र शिसवे, गृह विभागाचे उपसचिव अरविंद शेटे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. मंत्री ॲड. फुंडकर म्हणाले



की, गिग व प्लॅटफॉर्म वर्कर्सची नोंदणी ज्या प्लॅटफॉर्मवर 'पार्टनर' म्हणून केली जाते, त्या कंपन्यांनीच या कामगारांच्या पार्श्वभूमी तपासाची पूर्ण जबाबदारी स्वीकारली पाहिजे. डिलिव्हरीसाठी वापरल्या जाणाऱ्या वाहनांचे व्यवसायिक रजिस्ट्रेशन, चालकांकडे वैध ड्रायव्हिंग लायसन्स आहे का, त्यांना पगार कसा व कोणत्या माध्यमातून दिला जातो, या सर्व बाबींचा संबंधित सर्व विभागांच्या समन्वयाने अभ्यास करून सर्वसमावेशक आराखडा तयार करावा, असे निर्देश मंत्री ॲड. फुंडकर यांनी यावेळी दिले.

**सायबर विभागाकडे नोंदणी गरजेची**

राज्यातील ऑनलाइन फूड व अन्य वस्तू वितरण करणाऱ्या कंपन्यांमध्ये कार्यरत गिग व प्लॅटफॉर्म कामगारांच्या सुरक्षिततेसह त्यांच्या नियमनासाठी कठोर उपाययोजना करण्याची गरज या बैठकीमध्ये अधोरेखित करण्यात आली. राज्यातील बहुतेक ॲग्रीगेटर कंपन्या ऑनलाइन प्लॅटफॉर्मद्वारे काम करत असून, त्या थेट कर्मचारी भरती न करता तृतीय पक्ष (थर्ड पार्टी) संस्थांमार्फत गिग कामगारांची नियुक्ती करतात. त्यामुळे पारंपरिक नियोक्ता-कामगार संबंध निर्माण होत नाहीत आणि जबाबदाऱ्यांमध्ये अस्पष्टता राहते. गिग कामगारांची नियुक्ती प्रामुख्याने ॲप-आधारित प्रणालीद्वारे केली जाते. यासाठी आधारकार्ड, पॅनकार्ड, बँक तपशील, ड्रायव्हिंग लायसन्स, वाहन कागदपत्रे, विमा, ई-श्रम नोंदणी यांसह विविध कागदपत्रे आवश्यक ठरवली जातात. मात्र, या प्रक्रियेत एकसमान नियमावली गरजेची आहे. त्याचप्रमाणे सर्व गिग कामगारांची सायबर विभागाकडे नोंदणी, तसेच क्यूआर कोड असलेले ओळखपत्र बाळगणे सक्तीचे करण्याबाबत आणि ग्राहकांच्या मागणीनुसार सादर करणे अनिवार्य करण्याबाबत बैठकीमध्ये चर्चा करण्यात आली.

बैठकीत राज्यस्तरीय गिग कामगार नोंदणी व ऑनलाइन कंपन्यांची परवाना प्रणाली, तसेच डिजिटल ओळख व युनिक आयडी प्रणाली विकसित करणे, अपघात विमा व सामाजिक सुरक्षा योजना लागू करणे, तक्रार निवारण यंत्रणा व कंपन्यांची जबाबदारी निश्चित करणे आदी महत्त्वाच्या मुद्द्यावर चर्चा झाली. महिला प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने ओला, उबरसारख्या कंपन्यांमध्ये महिला प्रवाशांना महिला चालक निवडण्याचा पर्याय उपलब्ध करून देणे, प्रत्येक कंपनीने गिग कामगारांच्या कामकाजाचे नियमित ऑडिट करून संशयास्पद बाबी आढळल्यास तिमाही अहवाल पोलिसांकडे सादर करणे आदी मुद्द्यावरही यावेळी चर्चा करण्यात आली. राज्यातील वाढत्या डिजिटल वितरण व्यवस्थेमध्ये नागरिकांची सुरक्षितता प्सर्वाधिक महत्वाची आहे. त्यामुळे गिग व प्लॅटफॉर्म कामगारांसाठी गृह विभागाच्या समन्वयातून स्वतंत्र व स्पष्ट धोरणात्मक चौकट तयार करण्याचे निर्देशही मंत्री श्री. फुंडकर यांनी यावेळी दिले.

## नागरिकांसाठी आधुनिक बांधकाम साहित्याची 'वास्तु मटेरीका' प्रदर्शनी

प्रतिनिधी १० एप्रिल

खामगाव : खामगाव कन्सल्टंट सिव्हिल इंजिनियर्स (ACCE) खामगांव तर्फे '१२ एप्रिल २०२६ रविवार रोजी देवजी खिमजी मंगल कार्यालय, खामगांव' येथे एक दिवशीय प्रदर्शनीचे आयोजन केले आहे. प्रदर्शनीची वेळ सकाळी १०.३० ते रात्री ८ वाजेपर्यंत राहणार आहे.

प्रत्येक क्षेत्रात नवनवीन तंत्रज्ञान आणि क्रांतिकारी बदल होत आहेत. इमारत/घर बांधकामाशी संबंधित साहित्य व तंत्रज्ञानाची माहिती सर्वांना व्हावी यासाठी हे आयोजन करण्यात आले आहे. विविध आधुनिक साहित्य जसे टाइल्स, प्लंबिंग, लोखंड, वाटरप्रुफींग इत्यादी. तसेच सोलर पॅनल, सॅनिटरी अप्लायन्सेस, इलेक्ट्रिफिकेशन, इत्यादींबाबत नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान यांचे विविध स्टॉल्स या प्रदर्शनीमध्ये राहणार आहेत. सामान्य माणसाना स्वतःचे घर बांधताना नवीन विविध साहित्य व तंत्रज्ञानाची किमान माहिती असावी या हेतूने एकाच छताखाली सर्व बाबी उपलब्ध करून देण्याच्या हेतूने या प्रदर्शनीचे आयोजन केले आहे. याशिवाय संघटनेच्या स्थापत्य अभियंत्यांसाठी तांत्रिक व स्ट्रेस मॅनेजमेंट या विषयाच्या कार्यशाळेचे आयोजन केले आहे.

## अल्पवयीन मुलगी व युवकाचा आत्महत्येचा प्रयत्न

**खामगाव :** तालुक्यातील एका गावातील अल्पवयीन मुलगी व तांदुळवाडी येथील युवकाने विष प्राशन केल्याच्या वेगवेगळ्या घटना ९ एप्रिल रोजी समोर आल्या आहेत. प्रकृती बिघडल्याने दोघांना तातडीने स्थानिक रुग्णालयात प्रथमोपचार देण्यात आले. त्यानंतर पुढील उपचारासाठी अकोला येथील शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले आहे.पहिल्या घटनेत, संबंधित मुलीने जास्त प्रमाणात विष प्राशन केल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. घटनेमागील कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलिसांकडून चौकशी सुरू आहे. सध्या मुलीची प्रकृती स्थिर असल्याची माहिती वैद्यकीय सूत्रांनी दिली.

## शिवछत्रपती क्रीडापीठांतर्गत क्रीडा प्रबोधिनींसाठी प्रवेश प्रक्रिया सुरु


प्रतिनिधी १० एप्रिल

**खामगाव :** राज्यात गुणवंत खेळाडू घडविण्यासाठी शिवछत्रपती क्रीडापीठ, पुणे अंतर्गत विविध क्रीडा प्रबोधिनी केंद्रांमध्ये सन २०२६-२७या वर्षासाठी १९ वर्षाखालील खेळाडूंच्या निवडीची प्रक्रिया जाहीर करण्यात आली आहे. सरळ प्रवेश तसेच खेळनिहाय कौशल्य चाचणीद्वारे निवासी प्रवेश दिला जाणार आहे.

राज्यातील अमरावती, नागपूर, अकोला, गडचिरोली, ठाणे, नाशिक, कोल्हापूर, औरंगाबाद आणि पुणे येथे क्रीडा प्रबोधिनी केंद्रे कार्यरत असून, नव्या प्रशिक्षणार्थीची निवड प्रस्तावित आहे. या प्रबोधिनींमध्ये आर्चरी, ज्युदो, हॅण्डबॉल, ॲथलेटिक्स, बॉक्सिंग, बॅडमिंटन, शूटिंग, कुस्ती, हॉकी, टेबल टेनिस, वेटलिफ्टिंग, जिम्नॅस्टिक्स, जलतरण, फुटबॉल, ट्रायथलॉन व सायकलिंग अशा एकूण १६ क्रीडा प्रकारांमध्ये प्रशिक्षण दिले जाते.क्रीडा प्रबोधिनीतील असलेल्या संबंधित खेळ राज्यस्तरावर पदक प्राप्त केलेले खेळाडू तसेच राष्ट्रीय स्तरावरील सहभागी खेळाडूंची तज्ज्ञ समितीद्वारे चाचणी घेऊन पात्र खेळाडूंची निवड केली जाणार आहे. वैद्यकीय चाचणीमध्ये निवड झालेल्या शारीरिक दृष्ट्या सुदृढ खेळाडूंची निवड करण्यात येईल. क्रीडा प्रबोधिनी प्रवेशासाठी अर्जदार हा १९ वर्षाखालील तसेच महाराष्ट्र राज्याचा रहीवासी असणे अनिवार्य आहे. क्रीडा प्रबोधिनी प्रवेशासाठी खेळाडूकडे राज्य,राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील सहभागी स्पर्धेतील प्रमाणपत्रे, आधारकार्ड तसेच नगरपालिका / ग्रामपंचायत यांनी दिलेले जन्म प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. पात्र खेळाडूंनी राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील सहभागी स्पर्धेतील प्रमाणपत्रे, आधारकार्ड तसेच नगरपालिका/ ग्रामपंचायत यांनी दिलेले जन्म प्रमाणपत्र जोडून जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बुलढाणा येथे २४ एप्रिल २०२६ पुर्वी सादर करावे. सदर अर्जात खेळाडूचा संपर्क क्रमांक, पुर्ण पत्ता, ई-मेल आयडी नमुद करावा.

## खामगावच्या अण्णाभाऊ साठे पुतळ्याच्या सौंदर्यीकरणासाठी स्मारक समितीचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

प्रतिनिधी १० एप्रिल



**बुलढाणा :** दिनांक ६ एप्रिल रोजी बुलढाणा जिल्ह्याचे नवनिर्वाचित जिल्हाधिकारी श्री प्रवीणकुमार देवरे साहेब यांना साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे स्मारक समिती, खामगाव यांच्या वतीने शहरातील साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याच्या ठिकाणाबाबत दीर्घकाळापासून प्रलंबित असलेल्या मागणीसंदर्भात जिल्हाधिकारी साहेब यांना निवेदन सादर करण्यात आले निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, खामगाव शहरात उभारण्यात आलेला डॉ. अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा हा केवळ एक पुतळा नसून तो समाजाच्या अस्मितेचे, संघर्षाचे आणि प्रेरणेचे जिवंत प्रतीक आहे. अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्य व कार्यातून वंचित, शोषित, कामगार आणि बहुजन समाजाला न्याय, आणि स्वाभिमान व लढण्याची प्रेरणा दिली आहे. त्यामुळे अन्नभाऊ साठे यांचा पुतळा ज्या ठिकाणी सध्या स्तित आहे, त्याच ठिकाणी कायमस्वरूपी स्मारक उभारून त्या परिसराचे सुशोभीकरण करण्यात यावे, ही जनतेची तीव्र भावना आहे. समितीने पुढे नमूद केले की, सदर ठिकाण हे नागरिकांच्या श्रद्धेचे केंद्र बनले असून दररोज अनेक नागरिक तेथे जाऊन अभिवादन करतात. व मागील २० वर्षापासून याच चौकात अन्नभाऊ साठे यांचे पुतळे उभारावे ही मागणी असुन याच चौकात अन्नभाऊंची प्रतिमा खुप वर्षापासून उभारलेली आहे अशा पवित्र स्थळाचे जतन व संवर्धन करणे ही प्रशासनाची नैतिक जबाबदारी आहे. त्यामुळे पुतळा अन्यत्र हलविण्याऐवजी त्याच ठिकाणी आकर्षक व भव्य स्मारक उभारून परिसराचे सौंदर्यीकरण करावे, तसेच आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी समिती व समस्त मातंग समाज बांधव यांच्या वतीने करण्यात आली आहे सदर निवेदनावर कृष्णा नाटेकर लखन सोनोने सुरेश बोरकर आशु खंडारे गोपाल वानखडे कृष्णा बोडदे नामदेव बाबुलकर अजय नाटेकर गणेश चांदणे गोलू कांबळे पवन खंदारे सनी बोरकर योगेश नाटेकर शिवा बाबूलकर सोमेश सोनोने सुनिल नाटेकर बाबूराव नाटेकर करण सकलकले रूपेश अवचार सुरेश तांबे बाबुराव नाटेकर अर्जुन कासारकर संजय सोनोने आकाश घोडे गणेश बोरकर यासह समिती व समाज बांधवांच्या असंख्य सह्या आहेत.

## कर आकारणीतील अडचणी दूर करा

### राकाँ नगरसेवकांची मागणी

प्रतिनिधी १० एप्रिल

**मलकापूर :** मलकापूर नगर परिषदने न.प. हद्दीतील मालमत्ता धारकांच्या मालमत्तेचे चतुर्थ वार्षिक कर आकारणी केली आहे. ही आकारणी अन्यायकारक असून त्यावर तातडीने निर्णय घेवून व सद्या सुरू असलेल्या सुनावणीमध्ये मालमत्ता धारकांना कमी वेळ देण्यात आला आहे. तो वाढवून देण्यात यावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या नगरसेवकांनी मुख्याधिकारी यांच्याकडे ८ एप्रिल रोजी केली. न. प. च्या अखत्यारीत असलेल्या शहरातील मालमत्ता धारकांच्या मालमत्तेचे चतुर्थ कर आकारणी काही महिन्यांपुर्वी करण्यात आली. त्यानंतर यावर मालमत्ताधारकांनी आक्षेप घेवून आपले म्हणणे न.प. प्रशासनाकडे दाखल केले होते. त्यानंतर न.प. प्रशासनाने मालमत्ताधारकांना या सुनावणी बाबतच्या नोटीस जारी केल्या होत्या. त्याअनुषंगाने ६ एप्रिल ते १० एप्रिलपर्यंत ही सुनावणी न.प. च्या प्रशासकीय ईमारतीमध्ये सुरू करण्यात आली आहे. मात्र ही सुनावणी करतांना यामध्ये फक्त सहाय्यक संचालक नगर रचना बुलढाणा व त्यांचे पथक असून यामध्ये नगर परिषदचे उपमुख्याधिकारी हे उपस्थित असतात. यामध्ये पाहिजे त्या प्रमाणात मालमत्ता धारकांचे समाधान होत नसून कमी कालावधीमध्ये ६ हजार आक्षेप दाखल करणाऱ्या मालमत्ता धारकांना न्याय मिळणार कसा? असा सवाल राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने करण्यात आला आहे. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष अरूण अग्रवाल, बाळू पाटील, जिल्हा सचिव शिवाजीराव घुले, जिल्हा उपाध्यक्ष ओबीसी सेल श्रावण वाघ, तालुका अध्यक्ष राजू साठे, शहर अध्यक्ष राजू डोफे, नगरसेवक ॲड. मजीद कुरेशी, नगर सेवक हबीब चव्हाण, विजय वानखेडे, संदीपसिंग राजपूत, लखन कुरैशी, इम्रान शेख, युवक तालुका कार्याध्यक्ष नितीन मुलांडे आदी उपस्थित होते.

## अतिक्रमण हटविण्याची मागणी

### टेंभुर्णा येथील ग्रामस्थांचे उपोषण

प्रतिनिधी १० एप्रिल

**खामगाव :** तालुक्यातील टेंभूर्णा येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मिरवणुकीच्या मार्गावर झालेल्या अतिक्रमणामुळे अडथळे निर्माण होत असून, हे अतिक्रमण तातडीने हटविण्याच्या मागणीसाठी नागरिकांनी उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर ९ एप्रिलपासून उपोषणास सुरुवात केली आहे.

निवेदनानुसार, गावातील काही नागरिकांनी रस्त्यावर पायऱ्या, बांधकाम साहित्य तसेच इतर वस्तू ठेवून अतिक्रमण केले आहे. त्यामुळे मिरवणुकीचा मार्ग अरुंद झाला असून, रथ, झेंडे आणि सजावटीस अडथळे निर्माण होत आहेत. परिणामी, मिरवणुकीच्या आयोजनात अडचणी येण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. यासंदर्भात ग्रामपंचायतीकडे वारंवार तोंडी तक्रारी करूनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून अतिक्रमण हटवावे, अशी मागणी आंदोलकांनी केली आहे. या उपोषणात अजय तेजराव मोरे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत.

## शोभाबाई तायडे यांचे निधन



**जळगाव जामोद :** कौस्तुभ नगरातील सेवानिवृत्त पोलिस कर्मचारी प्रकाश तायडे यांच्या पत्नी सौ. शोभाबाई प्रकाश तायडे यांचे ८ एप्रिल रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ६० वर्षाच्या होत्या. यांच्या पश्चात पती, मुलगी, ३ मुले व मोठा आप्त परिवार आहे.

## गॅस टंचाईमुळे ग्रामीण भागात पेटल्या चुली!



प्रतिनिधी १० एप्रिल

**खामगाव :** ग्रामीण भागातील महिलांना धुरापासून मुक्ती देण्यासाठी राबविण्यात आलेल्या प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेसमोर सध्या गॅस सिलिंडर टंचाईमुळे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सिलिंडर मिळण्यात होणाऱ्या विलंबाच्या तक्रारींमुळे अनेक ठिकाणी महिलांना पुन्हा पारंपरिक चुलीवर स्वयंपाक करण्याची वेळ येत असल्याचे दिसून येत आहे.

आंतरराष्ट्रीय स्तरावरील तणावपूर्ण परिस्थितीचा परिणाम इंधन पुरवठ्यावर होत असल्याची चर्चा असून, त्याचे पडसाद घरगुती गॅस उपलब्धतेवर उमटत असल्याचे सांगितले जात आहे. शहरातील व्यावसायिक वापरानंतर आता घरगुती वापरावर ही त्याचा परिणाम जाणवत असल्याचे काही ठिकाणी चित्र आहे. गॅस उपलब्ध न झाल्यास नागरिकांनी चुली, लाकूड, रॉकेल स्टोव्ह तसेच इलेक्ट्रिक शेगड्यांचा पर्याय स्वीकारला आहे. दरम्यान, लाकडाच्या वापरात वाढ झाल्याने वृक्षतोड वाढण्याची शक्यता व्यक्त होत असून, पर्यावरणीय समतोलावर ही त्याचे परिणाम होऊ शकतात. जिल्हा प्रशासनाने मात्र गॅसचा पुरेसा साठा उपलब्ध असून, पुरवठा सुरळीत सुरू असल्याचे स्पष्ट केले आहे.

# खामगाव नगर पालिकेची प्रस्तावित करवाढ रद्द करण्यासाठी कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी पुढाकार घ्यावा

## माजी आमदार दिलीपकुमार सानंदा यांचे आवाहन

प्रतिनिधी १० एप्रिल

**खामगाव :** खामगाव नगर पालिकेच्या प्रस्तावित मालमत्ता करवाढीला राज्य सरकारने तात्पुरती स्थगिती दिली असून याप्रकरणी मा.जिल्हाधिकारी बुलढाणा यांनी लवकरच स्वयंस्पष्ट अभिप्रायासह अहवाल सादर केल्यानंतर नगर विकास विभागात सुनावणी होणार असून त्यानंतर अंतिम निर्णय घेतला जाणार आहे.खामगाव नगर परिषदेने केलेली प्रस्तावित करवाढ ही सर्वसाधारण नागरीक,व्यापारी व व्यावसायीकांसाठी अन्यायकारक आहे. म्हणून कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी ठामपणे शासन दरबारी पाठपुरावा करुन ही प्रस्तावित बेकायदेशीर करवाढ रद्द करण्यासाठी पुढाकार घ्यावा असे जाहीर आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांनी केले आहे.

सानंदा यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की, करवाढीला खामगावकर जनतेचा विरोध नाही, दर चार वर्षांनी नियमाप्रमाणे करवाढ ही झालीच पाहिजे परंतू तसे न करता खामगाव न.प.ने अव्वाच्या सव्वादराने करवाढ केली आहे.त्या करवाढीला खामगावकर जनतेचा तीव्र विरोध होत आहे. यापुर्वी ज्या मालमत्तेवर २ हजार रुपये वार्षिक मालमत्ता कर आकारण्यात येत



होता त्याच मालमत्तेवर जवळपास ७० हजार रुपयांचा प्रस्तावित करवाढीची नोटीस देण्यात आली आहे. खुल्या भुखंडावर देखील अनेक पटीने मालमत्ता कर वाढविण्यात आले आहे.म्हणून खामगाव न.प.ने जी अवाजवी कर वाढ केली त्या करवाढी विरोधात व्यापारी, व्यावसायिक तसेच विविध सामाजिक संघटनांनी आक्षेप नोंदवत आंदोलनही केले.केंद्रीय राज्यमंत्री तथा बुलढाणा लोकसभा मतदार संघाचे खासदार प्रतापराव जाधव साहेबांनी या करवाढी विरोधात पुढाकार घेऊन डॉक्टर, वकील, नागरी संघटनांच्या प्रतिनिधींसह शहरातील सर्व संबंधीत मालमत्ता धारकांची खामगावात बैठक घेवून चर्चा केली होती. नामदार प्रतापराव जाधव यांनी हा प्रश्न राज्याचे उपमुख्यमंत्री तथा नगर विकास मंत्री ना. एकनाथजी शिंदे यांच्यापर्यंत प्रभावीपणे पोहचविला.त्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांनी या प्रकरणाची दखल घेवुन दि. १ एप्रिल २०२६ रोजीच्या पत्रान्वये खामगाव न.प.च्या मालमत्ता करवाढीला तात्पुरती स्थगीती देण्याचे आदेश देवुन या प्रकरणी लवकरच नगर विकास विभागात सुनावणी ठेवा असे निर्देश दिले आहे. यामुळे प्रस्तावित करवाढीला तात्पुरता स्थगनादेश मिळालेला परंतू ही स्थगीती कायम राहणार की नाही हे मा.जिल्हाधिकारी, खामगाव नगर पालीका प्रशासन आणि कामगार मंत्री आकाश फुंडकर यांच्या भुमिकेवर अवलंबुन आहे,अन्यथा नगर विकास मंत्र्यांनी दिलेला स्थगनादेश जास्त वेळ टिकणार नाही.

आकाश फुंडकर यांना खामगाव शहरवासीयांनी भरभरून मते दिली.फुंडकर यांना आमदार बनविण्यामध्ये तसेच खामगाव नगर पालिकमध्येसुद्धा भाजपाची सत्ता आणण्यामध्ये खामगाव शहरवासीयांचा सिंहाचा वाटा आहे. या प्रस्तावित अवाजवी करवाढीला सर्व स्तरातून विरोध होत आहे म्हणुन अश्या परिस्थितीमध्ये आकाश फुंडकरांनी त्यांचे प्रथम कर्तव्य समजुन खामगाव शहर वासीयांना न्याय देण्यासाठी पुढाकार घ्यावा, खामगाव नगर परिषदेच्या मा. नगराध्यक्षा यांच्यासह सर्व सदस्यांनी न.प.सभेमध्ये ही अन्यायकारक करवाढ मागे घेण्याचा ठराव घ्यावा व खामगाव शहर वासीयांची ही रास्त मागणी शासन दरबारी पुर्ण शक्तीनिशी मांडावी, असे जाहीर आवाहन माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांनी केले आहे. तसेच केंद्रीय राज्यमंत्री नामदार प्रतापराव जाधव यांनी पुढाकार घेवुन खामगाव नगर परिषदेच्या मालमत्ता करवाढीला उपमुख्यमंत्री महोदयांकडून स्थगीती मिळवुन दिल्याबदद्ल केंद्रीय राज्यमंत्री प्रताप जाधव यांचे माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांनी खामगाव शहर वासीयांच्या वतीने हार्दिक आभार देखील मानले आहे. खामगाव शहर वासीयांवर झालेली ही अन्यायकारक करवाढ रद्द करण्याचे भवितव्य खामगाव नगर पालीका व कामगार मंत्री आकाश फुंडकर यांच्या भुमिकेवर अवलंबुन आहे एवढे मात्र खरे !

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
शुक्रवार, दि. १० एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# अकोल्यात लोकशाहीचा थरार !



# महापालिकेत सत्ताधारी 'एसी' मध्ये, तर विरोधक 40 अंशात टेंटमध्ये

## पत्रकारांनीही फिरवली सत्तापक्षाकडे पाठ !

प्रतिनिधी १० एप्रिल

**अकोला :** अकोला महानगरपालिकेच्या इतिहासात आज लोकशाहीचा एक अजब आणि अभूतपूर्व संघर्ष पाहायला मिळाला. एकीकडे सत्ताधारी नगरसेवक महापालिकेच्या सभागृहात एसीच्या थंड हवेत सभा घेत असताना, दुसरीकडे निलंबित १६ नगरसेवकांसह संपूर्ण विरोधकांनी महापालिकेच्या आवारात चक्क 'टेंट' ठोकून 'प्रतिसभा' भरवली. ४० अंश सेल्सिअसच्या कडाक्याच्या उन्हात पार पडलेली ही 'टेंट महासभा' आज संपूर्ण शहरात चर्चेचा विषय ठरली आहे. न अधिकारी, न कर्मचारी; तरीही गाजली 'प्रतिसभा'. अकोला महापालिकेच्या प्रांगणात पहिल्यांदाच अशा प्रकारची सभा पार पडली. या सभेचे वैशिष्ट्य म्हणजे येथे एकही शासकीय अधिकारी किंवा कर्मचारी उपस्थित नव्हता. असे असूनही, निलंबित १६ नगरसेवकांसह काँग्रेस, वंचित बहुजन आघाडी आणि उद्धव सेनेच्या नगरसेवकांनी याठिकाणी लोकहिताचे अनेक मुद्दे अत्यंत आक्रमकपणे मांडले. गेल्या सभेत झालेल्या राड्यानंतर करण्यात आलेले निलंबन नियमबाह्य असल्याचा आरोप करत, या नगरसेवकांनी काळ्या फिती लावून सत्ताधाऱ्यांचा निषेध केला.



### पत्रकारांचा सत्तापक्षाला दे धक्का !

आजच्या या सत्तासंघर्षात एक मोठी घडामोडी पाहायला मिळाली. सत्ताधारी पक्षाची सभा सभागृहात सुरू असताना, बहुतांश पत्रकारांनी त्याकडे पाठ फिरवत विरोधकांच्या 'प्रतिसभे'ला प्राधान्य दिले. सत्तारुढ सभेत बसू देत नसल्याने गेल्यावेळी पत्रकारांनी देखील सत्तापक्षाचा निषेध केला होता. विरोधकांचा आवाज आणि त्यांनी मांडलेले प्रश्न कव्हर करण्यासाठी पत्रकारांची मोठी गर्दी टेंटमध्ये दिसून आली, ज्यामुळे सत्ताधारी गोटात अस्वस्थता पसरली होती.

### एसी विरुद्ध रणरणते ऊन !

सभागृहाबाहेर टेंटमध्ये बसलेल्या विरोधकांनी 'सत्ताधारी केवळ स्वतःच्या फायद्याचे निर्णय घेत असून सर्वसामान्यांच्या प्रश्नांची गळचेपी केली जात आहे,' अशी तोफ डागली. ३० मार्चच्या राड्यानंतर सुरू झालेला हा संघर्ष आता विकोपाला गेला आहे. निलंबनावर अद्याप कोणताही अधिकृत निर्णय न आल्याने विरोधकांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. सत्ताधारी आणि विरोधक आमने-सामने आल्याने अकोल्याचे राजकीय वातावरण तापले असून, आगामी काळात ही 'आरपार'ची लढाई काय वळण घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. गोटात अस्वस्थता पसरली होती.








## छोट्या हत्तीवर जीवघेणे ओझे

प्रतिनिधी १० एप्रिल

**अकोला :** लहान टेंपो जो छोटा हत्ती म्हणून ओळखला जातो त्याच्यावर जीवघेणे ओझे लादले जात आहे. यामुळे अपघात होऊ शकतो परंतु वाहतूक शाखा पोलिस दुर्लक्ष करताना दिसतात. याकडे वेळीच लक्ष देणे अत्यंत आवश्यक आहे.

शहरात रहदारीची समस्या गंभीर आहे. वाहने चालवणे कठीण असताना वाहने ओव्हरलोड ओझे लादून वाहतूक करतात. यामुळे मागे बार्शीटाकळी हजार वाहन उलटून अपघात झाला होता. तरी देखील त्यातून धडा घेतलेला दिसत नाही. दुर्घटना घडण्यापूर्वी ही समस्या दूर करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. वाहतूक शाखा यंत्रणेने या विषयाकडे लक्ष देण्याची गरज आहे.

### ♦ वाहतूक शाखेचे दुर्लक्ष



## प्रोफेशनल टॅक्स रद्द करण्याची मागणी

### विदर्भ चेंबरचे मुख्यमंत्र्यांना निवेदन


प्रतिनिधी १० एप्रिल

**अकोला :** विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री, अकोला यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व राज्याचे वित्त मंत्री देवेंद्र फडणवीस यांना एक महत्त्वपूर्ण पत्र सादर करून राज्यात लागू असलेला प्रोफेशनल टॅक्स रद्द करण्याची किंवा त्याची किमान मर्यादा वाढविण्याची मागणी केली आहे. चेंबरने आपल्या निवेदनात स्पष्ट केले की वस्तू व सेवा कर लागू करताना केंद्र व राज्य सरकारकडून विविध कर रद्द करण्याचे आश्वासन देण्यात आले होते, ज्यामध्ये प्रोफेशनल टॅक्सचाही समावेश अपेक्षित होता. तथापि, हा कर आजही लागू असून त्यामुळे व्यापारी व वेतनभोगी वर्गावर अतिरिक्त आर्थिक भार पडत आहे.

VCCI Estd 1933 Marching Towards Centenary 1933 - 2033

चेंबरच्या मते, सध्या ७,५०० पेक्षा अधिक वेतन असलेल्या कर्मचाऱ्यांवर हा कर लागू होतो, परंतु आजच्या महागाई, वाढता जीवनावश्यक खर्च आणि विद्यमान किमान वेतनाच्या निकषांच्या तुलनेत ही मर्यादा पूर्णतः कालबाह्य व अप्रासंगिक ठरली आहे. यासंदर्भात विदर्भ चेंबरचे अध्यक्ष निकेश गुप्ता यांनी स्पष्टपणे सांगितले की प्रोफेशनल टॅक्स सध्याच्या आर्थिक परिस्थितीत पूर्णतः अप्रासंगिक ठरला असून तो तात्काळ रद्द करण्यात यावा. तसेच, तो रद्द करणे शक्य नसल्यास किमान करपात्र मर्यादा ही विद्यमान वेतन संरचनेशी सुसंगतपणे वाढविणे अत्यंत आवश्यक आहे, असे त्यांनी ठामपणे नमूद केले. पत्रात पुढे नमूद करण्यात आले आहे की या करामुळे विशेषतः निम्न व मध्यम उत्पन्न गटातील कर्मचाऱ्यांवर अनावश्यक आर्थिक ताण येत असून, हे इज ऑफ डुइंग बिझनेस व इज ऑफ लिविंग या महत्त्वाच्या उद्दिष्टांच्या विरोधात आहे. विदर्भ चेंबरने राज्य सरकारला विनंती केली आहे की प्रोफेशनल टॅक्स पूर्णतः रद्द करावा किंवा किमान करपात्र वेतन मर्यादा विद्यमान किमान वेतनाच्या अनुरूप लक्षणीयरीत्या वाढवावी, जेणेकरून सर्वसामान्य नागरिकांना दिलासा मिळू शकेल. या विषयावर राज्य सरकार सकारात्मक निर्णय घेऊन व्यापारी व कर्मचारी वर्गाला मोठा दिलासा देईल, असा विश्वास चेंबरचे उपाध्यक्ष सिद्धार्थ रुहाटिया, निखिल अग्रवाल, मानद सचिव निरव वोरा, कोषाध्यक्ष किशोर बाछुका तसेच सहसचिव किरीट मंत्री तसेच चेम्बरच्या जीएसटी समिती चे सदस्य अ‍ॅड. गिरीश धाबलिया, अ‍ॅड. धनंजय पाटील व सीए दीपक अग्रवाल यांनी व्यक्त केला आहे.

## ईशानी आनंद यांचे मुली, महिलांना मार्गदर्शन



**अकोला :** शिवर येथील संत गजानन महाराज मंदिरात एमआयडीसी पोलिस स्टेशनच्या प्रभारी अधिकारी ईशानी आनंद मॅडम प्रभारी यांनी मुले मुली व महिलांना मार्गदर्शन केले. ज्यामध्ये आई-वडिलांना काही न सांगता एकटे कुठेही जाऊ नये तसेच आई-वडिलांनी मुले काय करतात यावर लक्ष देणे गरजेचे आहे. सायबर क्राईम बाबत त्यांनी कोणतीही अ‍ॅप डाउनलोड व चालू करू नये. त्यामुळे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता असते. कोणतेही धार्मिक आक्षेपार्य पोस्ट स्टेटसवर ठेवणे अथवा फॉरवर्डड करू नये. यामुळे कोणतीही अनुचित घटना घडू शकते याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला शिवर मधील मुले मुली व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## बोरगाव वनक्षेत्रात लागली आग

प्रतिनिधी १० एप्रिल



**अकोला :** ०९ एप्रिल रोजी अकोला वनविभागाच्या बोरगाव मंजू बिट मधील कंम्पार्टमेंट क्रमांक सीएन ३९० मध्ये आग लागली. प्राथमिक माहितीनुसार, जंगलालगत असलेल्या उच्च दाब ट्रान्सफॉर्मरमध्ये झालेल्या स्पार्क तसेच वीज वाहिनीतील शॉर्ट सर्किटमुळे ही आग लागल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. सदर आग प्रथम कृषि विद्यापीठ, अकोला यांच्या ताब्यातील जंगल क्षेत्रात लागून नंतर ती वन विभागाच्या शेजारील जंगलात पसरली.

या आगीमुळे वनक्षेत्रातील गवत, झुडपे व लहान वृक्षांचे नुकसान झाले असून, नुकसानीचा प्राथमिक अंदाज घेतला जात आहे. वन विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न केले असून, मोठ्या प्रमाणात आग नियंत्रणात आणण्यात यश आले आहे.

घटनेची माहिती संबंधित वीज वितरण विभागाला देण्यात आली असून, पुढील अशा घटना टाळण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच, या घटनेबाबत सविस्तर पंचनामा व चौकशी सुरू आहे.

वन विभाग नागरिकांना आवाहन करीत आहे की, उन्हाळ्याच्या काळात जंगल परिसरात आग लागू नये यासाठी विशेष काळजी घ्यावी व कोणतीही संशयास्पद घटना दिसल्यास तात्काळ वन विभागास कळवावे असे आवाहन वनपरिक्षेत्र अधिकारी, (प्रादेशिक) अकोला यांनी केले आहे.

## बालाजी नगरात चोरी लाखो रुपयांचा ऐवज लंपास

प्रतिनिधी १० एप्रिल

**अकोला :** डाबकी रोड पोलिस स्टेशन अंतर्गत बालाजी नगरातील अमरप्रित कॉलनीत मुरली विजय ढोले यांच्या निवासस्थानी चोरी झाली. काल रात्री झालेल्या घटनेत चोरट्यांनी लाखो रुपयांचा ऐवज लंपास केला.

अज्ञात चोरट्यांनी घरातील आलमारीतून रोख रक्कम, सोने चांदीचे दागिने चोरून नेले. आणि फरार झाले. ढोले यांच्या फिर्यादीवरून डाबकी रोड पोलिस तपास करीत आहेत. पोलिसांनी घटनास्थळी पोहचून पाहणी केली.



## उन्हाच्या तीव्रतेने जिल्ह्यातील जलप्रकल्पात घट

प्रतिनिधी १० एप्रिल

**अकोला :** जिल्ह्यातील मोठ्या, मध्यम व लघू प्रकल्पातील पाणी पातळी गेल्या काही दिवसांपासून तापमानात वाढ होत असल्याने चांगलीच खालावली आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात अकोला जिल्ह्यातील नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अकोला तसेच मूर्तीजापुर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या महान प्रकल्पात सद्यस्थितीत ३६.९४ टक्के जल साठा उपलब्ध आहे.

अकोला जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून उन्हाची तिव्रता चांगलीच वाढली असून पारा सद्यास्थितीत ४० अंश सेल्सिअसवर पोहोचला आहे. उन्हाच्या वाढत्या तीव्रतेमुळे अकोला जिल्ह्यातील लघू, मध्यम तसेच मोठ्या प्रकल्पातील पाणी पातळीत घसरण होत आहे. अकोला जिल्ह्यातील सर्वात मोठा प्रकल्प म्हणून ओळख असलेल्या महान धरणात सध्या ३६.९४ टक्के जल साठा उपलब्ध असून येणाऱ्या काही दिवसात पाणी पातळीत अशीच घसरण झाल्यास अकोला तसेच मूर्तिजापूर येथील नागरिकांसमोर पाणी प्रश्न उपस्थित राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे. जिल्ह्यातील इतर प्रकल्पाचा विचार केला असता तेल्हारा तालुक्यातील वाण प्रकल्पात ५३.२७ टक्के, पातूर तालुक्यातील मोर्णा प्रकल्पात ४७.९२ टक्के, बार्शीटाकळी तालुक्यातील दगडपारवा प्रकल्पात ६७.४१ टक्के, मूर्तिजापूर तालुक्यातील उमा मध्यम प्रकल्पात ११ टक्के, वाई लघु प्रकल्पात ४५.६२ टक्के, शिवण लघु प्रकल्पात ३१.११ टक्के, निर्गुणा प्रकल्पात २२.५३ टक्के, पातूर तालुक्यातील गावंडगाव लघु प्रकल्पात ४२.९५ टक्के, विश्वामित्री लघू प्रकल्पात ४.१२ टक्के, तुळजापूर लघू प्रकल्पात ३५ टक्के जलसाठा सध्या उपलब्ध असल्याची माहिती पाटबंधारे विभागाने दिली आहे.



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK